दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३२६ I बुधवार ९ सप्टेंबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## खेळाडूंच्या सुधारित आरक्षण धोरणास मंत्रिमंडळाची मान्यता

**मुंबई :** राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना प्रोत्साहन आणि सामाजिक सुरक्षितता मिळावी यासाठी शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षणाबाबतचे सुधारित धोरण आज मंत्रिमंडळाने मंजूर केले आहे,अशी माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.केंद्र शासनाचा राष्ट्रीय क्रीडा कायदा -२०२५ लागू झाला असून, याद्वारे राष्ट्रीय क्रीडा मंडळ देखील स्थापन झाले आहे.२००५ पासून लागू असलेल्या धोरणातील बदल, क्रीडा संघटनांमधील बदल, बोगस प्रमाणपत्रांची पडताळणी पारदर्शकपणे करण्यासाठी 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली आणि केंद्र शासनाचे राष्ट्रीय क्रीडा कायदा - २०२५ तसेच राष्ट्रीय क्रीडा मंडळ लक्षात घेऊन हे सुधारित धोरण तयार करण्यात आले आहे. आता केवळ राष्ट्रीय क्रीडा मंडळ मान्यताप्राप्त राष्ट्रीय संघटनांनी आयोजित केलेल्या स्पर्धांचाच खेळाडू आरक्षणासाठी विचार केला जाईल. थेट नियुक्ती धोरण आणि 'मिशन लक्ष्यवेध' योजना यांचा विचार करून पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून एकत्रित सुधारित धोरण लागू करण्यात येणार आहे, अशी माहितीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

# जरांगेंनी दोन पावले पुढे यावे

## विखेंचे आवाहन : सरकारने १५ पैकी १२ मागण्या मान्य केल्या

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे सुरू असलेले आमरण उपोषण आज अकराव्या दिवशीही कायम असून, त्यांच्या प्रकृतीची चिंता वाढत असतानाच सरकार आणि जरांगे यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांवर आवश्यक निर्णय घेतल्याचा दावा करत 'सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे; आता जरांगे पाटील यांनी दोन पावले पुढे यावे,' असे आवाहन मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. त्यामुळे १२ सप्टेंबर रोजी होणाऱ्या बैठकीनंतर जरांगे पाटील मुंबईकडे कूच करणार की सरकारशी तोडगा काढणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची प्रकृती खालावत असूनही त्यांनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला आहे. काल मध्यरात्री प्रकृती आणखी बिघडल्यानंतर मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी फोनवरून त्यांना सलाईन घेण्याची विनंती केली. त्यानंतर जरांगे यांनी सलाईन घेतले असले तरी मागण्या पूर्ण झाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही,



अशी भूमिका त्यांनी पुन्हा स्पष्ट केली. मागण्या मान्य न झाल्यास १२ सप्टेंबरनंतर मुंबईकडे कूच करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, विखे पाटील यांनी सरकारची बाजू स्पष्ट करताना मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सरकारने आवश्यक ते निर्णय घेतले असून त्यांची अंमलबजावणीही सुरू असल्याचा दावा केला. जरांगे पाटील या निर्णयांवर समाधानी नसतील, तर त्यांचे समाधान करण्यासाठी म झ्याकडे आता दुसरा पर्याय नाही, असे सूचक वक्तव्य त्यांनी केले.

जरांगे पाटील यांनी उपस्थित केलेल्या ५८ लाख नोंदींच्या मुद्द्यावरही विखे पाटील यांनी भाष्य केले. या नोंदी ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध

### १२ सप्टेंबरला मुंबईकडे कूच करण्याच्या भूमिकेवर सरकारचा दबाव वाढला

### 'राजकारणासाठी आंदोलनाचा वापर नको'

**मराठा आंदोलनाच्या माध्यमातून राजकारण केले जात आहे का, असा सवाल उपस्थित झाल्यानंतर विखे पाटील यांनी सरकारची भूमिका मांडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म राठा समाजाच्या प्रश्नावर पुढाकार घेत अनेक निर्णय घेतले आहेत. प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या नेत्यांवर टीका करणे योग्य नाही, असे ते म्हणाले.**

करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच १० ते १७ सप्टेंबरदरम्यान मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून पात्र नागरिकांनी आवश्यक अर्ज करावेत, असे आवाहन सरकारकडून करण्यात आले आहे.

मात्र, या प्रक्रियेला समाजाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचा (पान ४ वर)

### सात पिढ्या राजकारणात असल्या तरी विखेंना उखडून टाकू...



विखे-पाटील मराठ्यांचे वाटोळे करत आहे. फक्त फडणवीसचे गुणगान गायचे आणि शरद पवारने काहीच दिले नाही एवढेच तुणतुणे यांनी वर्षभर वाजवले. मराठ्यांना मोठं करण्याचा विडा घेतला तर अपमान पचवायची ताकद ठेवा. तुम्ही वर्षभर मराठ्यांना कशाला नाचवले? तुम्ही सपशेल अपयशी ठरलात. मराठ्यांना तुम्ही दगा फटका दिला, तुमच्यामुळे मराठ्यांचे वाटोळ झाले. तू अंतरवालीमध्ये ये किंवा नको येऊ तुला बोलवत नाहीत. सरकारला समजून घ्यायला सरकार बाप आहे का? देवेंद्र फडणवीस हा आजवरचा सगळ्यात निष्क्रिय मुख्यमंत्री आहे, अशी टीका मनोज जरांगे यांनी केली. तुमचे ठरले आहे मराठ्यांच्या रॅलीवर हल्ला करायचा. याला पाऊल म्हणतात का, तुम्ही मराठ्यांना कलंक आहात. तुम्हाला अंतरावलीमध्ये कोण ये म्हणते. येत नसतील तर नको येऊ. तुझ्या सात पिढ्या राजकारणात असल्या तरी मी जरांगे आहे, उखडून टाकू,

**- मनोज जरांगे**

# 'डॉल्बी वाजवणारे हिंदूविरोधी!'

## संभाजी भिडे यांचा घणाघात; दहीहंडीतील डीजे, डॉल्बी आणि नृत्यांवरून महाराष्ट्रात संताप

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** हिंदू सण-उत्सवांमध्ये डॉल्बी वाजवणारे हिंदूविरोधी आहेत. संपूर्ण देशाने हिंदू सणांमध्ये वाजणारे डॉल्बी फ ेकून दिले पाहिजे, असा घणाघाती हल्ला शिव प्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी केला आहे. दहीहंडीच्या नावाखाली सुरू असलेला डीजे-डॉल्बीचा कर्णकर्कश आवाज, महिलांचे नृत्य आणि आक्षेपार्ह हावभाव यावरून सोशल मीडियावर नागरिकांकडून संताप व्यक्त होत असतानाच भिडे यांच्या भूमिकेने या वादाला आणखी धार आली आहे.

दहीहंडी हा हिंदूंचा धार्मिक उत्सव असताना त्यामध्ये नृत्यांगनांचे कार्यक्रम आयोजित करण्यावरही भिडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हिंदू सणांमध्ये महिला नाचवणे योग्य नाही, असे स्पष्ट करत त्यांनी अशा कार्यक्रमांच्या आयोजकांवर कठोर शब्दांत टीका केली. डॉल्बी वाजवून नेमके काय साध्य होते, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही दहीहंडीतील डीजे, डॉल्बी आणि लेझर लाईटच्या वापरावर जोरदार आक्षेप घेतला आहे. डीजे-डॉल्बी ही उत्तरेकडील संस्कृती महाराष्ट्रात आणायची का? असा सवाल करत त्यांनी महाराष्ट्राच्या सण-उत्सवांची परंपरा आणि संस्कृती जपण्याचे आवाहन केले. अतिप्रचंड आवाजामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, तसेच सणांचा मूळ उद्देशच बाजूला पडत असल्याचे त्यांनी म्हटले.

दहीहंडी उत्सवातील अभिनेत्री व नृत्यांगनांच्या कार्यक्रमांवरही नागरिक आणि विचारवंतांकडून प्रश्न उपस्थित होत आहेत. धार्मिक उत्सवाच्या नावाखाली मनोरंजनाचा अतिरेक आणि संस्कृतीचे बाजारीकरण होत आहे का? असा सवाल आता चर्चेत आला आहे. (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### २२० किमी वेगाने येतोय सुपर टायफून

**मुंबई :** हवामान बदलाचे भयानक सावट आणि समुद्राच्या वाढत्या तापमानामुळे निसर्गाने आपले अत्यंत क्रूर रूप दाखवण्यास सुरुवात केली आहे. आशियाई सागरी पट्ट्यात सध्या एका महाकाय चक्रीवादळाचे थैमान सुरू असून, 'सौडेल' नावाचे हे विनाशकारी सुपर टायफून भारताच्या शेजारील देशांच्या उंबरठ्यावर धडकण्यासाठी सज्ज झाले आहे.

वाऱ्याचा वेग ताशी २२० किलोमीटरपेक्षा जास्त वाढण्याची शक्यता असल्याने हवामान खात्याने पुढील १२ ते २४ तासांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. समुद्रात उसळणाऱ्या भयानक लाटा आणि आकाशातून कोसळणारा पाऊस यामुळे लाखो लोकांचा जीव टांगणीला लागला आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, पॅसिफिक महासागरात जन्माला आलेले सौडेल हे वादळ आता कॅटेगरी-३ च्या महाचक्रीवादळात रूपांतरित झाले आहे. हे वादळ सायपान बेटांपासून अवघ्या काही अंतरावर असून वेगाने उत्तर-पश्चिम दिशेने सरकत आहे. वादळाच्या भीषणतेचा अंदाज घेऊन सायपानसह संपूर्ण उत्तर मारियाना द्वीपसमूहात 'टायफून कंडिशन-१' लागू करण्यात आली आहे.

# 'भावपूर्ण श्रद्धांजली' पोस्टने संगमनेरचे राजकारण तापले

## आमदार अमोल खताळ आक्रमक; बदनामीमागे कोण? राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

### सोशल मीडियावरील धमकीवजा पोस्टप्रकरणी कायदेशीर कारवाईचा इशारा; 'यामागचे सूत्रधार शोधणार': खताळ

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर :** संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांच्या संदर्भात सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या आक्षेपार्ह आणि धमकीवजा पोस्टने संगम नेरच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जिवंत व्यक्तीच्या छायाचित्रासह 'भावपूर्ण श्रद्धांजली'चा मजकूर प्रसारित होणे आणि त्यासोबत धमकीवजा आशय असणे, या प्रकाराम ुळे राजकीय वातावरण तापले असून या पोस्टमागे नेमके कोण आहे, याची चर्चा आता सुरू झाली आहे.

संगमनेरमधील प्रसाद गुंजाळ नामक तरुणाने आमदार अमोल खताळ यांच्या नावाने विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आक्षेपार्ह पोस्ट केल्याचा आरोप आहे. एका पोस्टमध्ये खताळ यांना उद्देशून व्यवहार मिटविण्याचा उल्लेख करत धमकीवजा भाषा वापरण्यात आली आहे. तर दुसऱ्या पोस्टमध्ये 'लवकरच भावपूर्ण श्रद्धांजली' अशा आशयाचा मजकूर वापरून आमदारांचा फोटो प्रसारित करण्यात आल्याचे सांगण्यात येते.

या प्रकारामुळे केवळ सोशल मीडिया वर्तुळातच नव्हे, तर संगमनेरच्या राजकीय वर्तुळातही उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. लोकप्रतिनिधीविषयी अशा प्रकारच्या पोस्टचा वापर राजकीय संघर्षासाठी केला जात आहे का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

या प्रकारावर आम दार अमोल खताळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सातत्याने आपली बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात असून, आता मात्र शांत बसणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संबंधित व्यक्तीला कायदेशीर नोटीस बजावून गुन्हा दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

'मी कायद्याचा सन्मान करतो म्हणून आतापर्यंत शांत आहे. मात्र, संगमनेरचे राजकारण अत्यंत खालच्या पातळीवर गेले आहे. आता शांत बसणार नाही,' अशी भूमिका खताळ यांनी घेतली.

आपल्याला संबंधित व्यक्तीशी कोणताही आर्थिक व्यवहार अथवा (पान ४ वर)

### 'माझ्या आमदारकीची काळजी करू नका!'



**तुम्ही माझ्या आमदारकीची काळजी करू नका. जनतेने मला निवडून दिले आहे. न्यायालयातही मला न्याय मिळेल, अशा शब्दांत आमदार अमोल खताळ यांनी आमदार सत्यजित तांबे यांचे नाव न घेता जोरदार पलटवार केला. काहींना झालेला पराभव अद्याप पचलेला नसून आपल्याला त्रास देण्यासाठी षडयंत्र सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. कॅमेऱ्यासमोर वेगळे बोलायचे आणि मागे षडयंत्र करायचे, हे काहींचे काम असल्याचे ते म्हणाले. शहरातील रस्ते, पाणी, वीज आणि सीसीटीव्ही यांसारख्या विकासकामांना प्राधान्य देत असल्याचे सांगत खताळ यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाल्याचा दावा केला. मी चोवीस तास जनतेत असतो; त्यामुळे माझ्या आमदारकीची काळजी करू नका, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.**

# भरती परीक्षांचा घोळ संपवण्यासाठी टास्क फोर्स मैदानात !

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील विविध भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या दृष्टीने शासनाने गठित केलेला उच्चस्तरीय टास्क फोर्स आता थेट विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक आणि संबंधित घटकांशी संवाद साधणार आहे. परीक्षा प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, गैरप्रकार तसेच आवश्यक सुधारणांबाबत प्रत्यक्ष अनुभव जाणून घेण्यासाठी सप्टेंबर महिन्यात राज्यातील सहा विभागांचा दौरा करण्यात येणार आहे.

राज्यातील भरती परीक्षांच्या सध्याच्या पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून त्यामध्ये आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे या उच्चस्तरीय टास्क फोर्सची स्थापना केली आहे. भरती परीक्षांमध्ये पारदर्शकता वाढविणे, परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता टिकविणे आणि गैरप्रकारांना प्रभावीपणे आळा घालणे, हा या समितीच्या कामकाजाचा प्रमुख उद्देश आहे.

### सप्टेंबरमध्ये सहा विभागांचा दौरा

टास्क फोर्सच्या विभागनिहाय दौऱ्यात विविध ठिकाणी विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षा उमेदवारांशी थेट चर्चा केली जाणार आहे. त्याचबरोबर पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित अन्य घटकांचेही म्हणणे जाणून घेतले जाणार आहे. परीक्षेच्या तयारीपासून ते निकालापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत उमेदवारांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याची माहिती या संवादातून घेतली जाणार आहे.

परीक्षा केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, प्रश्नपत्रिका व परीक्षा साहित्याची गोपनीयता, तांत्रिक यंत्रणेचा वापर, परीक्षा आयोजनातील अडचणी, वेळापत्रक, उमेदवारांची ओळख पडताळणी आणि गैरप्रकार रोखण्यासाठीच्या (पान ४ वर)

# सातबारा नोंदीसाठी लाच; महिला मंडळ अधिकाऱ्याला अटक

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सातबारा उताऱ्यावरील नोंद संगणकीकृत करण्यासाठी चार हजार रुपयांची लाच मागणाऱ्या कापुरवाडी मंडळ अधिकारी संगिता नारायण पुंड यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, बुऱ्हानगर येथील गट क्रमांक ६ मधील प्लॉट क्रमांक ४९ पैकी २१०.९० चौ. मीटर क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराची नोंद फेरफार क्रमांक ६८०२ नुसार सातबारा उताऱ्यावर झाली होती. मात्र संगणकीकृत सातबारा प्रक्रियेत ही नोंद कार्यान्वित झाली नसल्याने ऑनलाइन सातबारा उतारा मिळविण्यासाठी तक्रारदाराने तहसीलदार कार्यालयात अर्ज केला होता. या अर्जाची चौकशी मंडळ अधिकारी संगिता पुंड यांच्याकडे देण्यात आली होती.

चौकशी पूर्ण करून नोंद संगणकीकृत करण्यासाठी त्यांनी तक्रारदाराकडे पाच हजार रुपयांची मागणी (पान ४ वर)

# स्त्रीभ्रूणहत्येविरोधात राज्यस्तरीय कृती दलाची स्थापना

## डॉ. नीलम गोऱ्हे अध्यक्षपदी : सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांवर अचानक तपासणी; उल्लंघन आढळल्यास तातडीने कारवाईचे अधिकार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यातील स्त्रीभ्रूणहत्या आणि बेकायदेशीर गर्भपाताला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कठोर पाऊल उचलले आहे. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (पीसीपीएनडीटी) तसेच वैद्यकीय गर्भपात कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. विधानपरिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांची या कृती दलाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून सार्वजनिक आरोग्य विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

राज्यातील सोनोग्राफी केंद्रे, तत्सम निदान केंद्रे आणि वैद्यकीय गर्भपात केंद्रांवर प्रभावी देखरेख ठेवणे, कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी शोधणे आणि संबंधित शासकीय विभागांमध्ये समन्वय साधणे, हे या कृती दलाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पीसीपीएनडीटी आणि गर्भपात प्रतिबंधक कायद्यांच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याची काही प्रकरणे निदर्शनास आल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने हा निर्णय घेतला आहे.



डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखालील या कृती दलात विधानपरिषद सदस्या डॉ. प्रज्ञा सातव, भावना गवळी, चित्रा वाघ, उमा खापरे, डॉ. मनीषा कायंदे तसेच विधानसभा सदस्या स्नेहा दुबे पंडित आणि श्वेता महाले यांचा समावेश करण्यात आला आहे. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे येथील अतिरिक्त संचालक सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

कृती दलाकडून राज्यातील विविध जिल्हे तसेच महानगरपालिका क्षेत्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला जाणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांसोबत सोनोग्राफी आणि वैद्यकीय गर्भपात केंद्रांना अचानक भेटी देऊन तपासणी केली जाणार आहे. तपासणीदरम्यान कायद्याचे उल्लंघन आढळल्यास संबंधित प्राधिकरणाला तातडीने (पान ४ वर)

### दर तीन महिन्यांनी शासनाला अहवाल

**कायद्याच्या अंमलबजावणीत असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी शासनाला शिफारशी करणे, जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या समन्वय बैठका घेणे आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी प्रभावी जनजागृती उपाययोजना सुचविणे, ही जबाबदारीही कृती दलावर सोपविण्यात आली आहे.**

# भरधाव कंटेनरच्या धडकेत विद्यार्थिनी ठार, वडील व बहीण गंभीर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** कात्रज-कोंढवा रस्त्यावर मंगळवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात वडिलांसोबत दुचाकीवरून शाळेत जाणाऱ्या १६ वर्षीय विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाला. प्रतिभा नाईक असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. या अपघातात तिचे वडील व बहीण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नाईक कुटुंबातील वडील आपल्या दोन मुलींना नेहमीप्रमाणे दुचाकीवरून शाळेत सोडण्यासाठी जात होते. कात्रज-कोंढवा रस्त्यावरील भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत कपिलामृत डेअरीसमोर त्यांची दुचाकी आली असता, कात्रजकडून कोंढव्याच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनरने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.

धडक एवढी भीषण होती की, दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर फेकले गेले. यात प्रतिभा नाईक हिला गंभीर दुखापत झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तिचे वडील व बहीण गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेत अटकेची कारवाई केली असून, अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

# लालपरीला 'स्मार्ट' करण्याच्या नादात प्रवाशांची फरफट..?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी एसटी केवळ प्रवासाचे साधन नाही. विशेषतः अहिल्यानगरसारख्या विस्तीर्ण आणि मोठ्या ग्रामीण भाग असलेल्या जिल्ह्यात एसटी म्हणजे अनेक गावांची शहराशी जोडलेली एकमेव नाळ आहे. विद्यार्थ्यांसाठी शाळा-महाविद्यालय, शेतकऱ्यांसाठी बाजारपेठ, महिलांसाठी रोजगार व स्वावलंबन आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी दवाखाना, बँक अथवा सरकारी कार्यालय गाठण्याचा विश्वासाचा आधार म्हणजे लालपरी.

मात्र, या लालपरीला 'डिजिटल' करण्याच्या प्रयत्नात तिच्यावर अवलंबून असलेल्या सर्वसामान्य प्रवाशांचीच फरफट होणार असेल, तर या व्यवस्थेचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे.

महिला सन्मान योजनेअंतर्गत अर्ध्या तिकिटाची सवलत मिळवण्यासाठी 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' अर्थात एनसीएमसी स्मार्ट कार्डची सक्ती करण्यात आली आहे. १ सप्टेंबरपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर राज्यभरातील एसटी आगारांमध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या रांगा लागल्या आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात तर या निर्णयाचे परिणाम अधिक तीव्रतेने जाणवण्याची शक्यता आहे.

कार्ड काढण्यासाठी आधार जोडणी, बायोमेट्रिक, ओटीपी, रिचार्ज, टॉपअप आणि सर्व्हरच्या समस्या... डिजिटल सुविधेच्या नावाखाली या सगळ्या प्रक्रियेत एखाद्या ग्रामीण, अशिक्षित किंवा तंत्रज्ञानाची सवय नसलेल्या ज्येष्ठ महिलेला किती मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागतो, याचा विचार निर्णय घेणाऱ्यांनी केला आहे का?

यापूर्वी आधार कार्ड दाखवून महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सवलतीचा लाभ सहज मिळत होता. व्यवस्था सोपी होती आणि प्रवाशालाही ती समजत होती. मग अचानक डिजिटल कार्डची सक्ती करण्याची गरज का निर्माण झाली? डिजिटल व्यवस्था ही प्रवाशांची सोय करण्यासाठी असते; प्रवाशांना डिजिटल व्यवस्थेच्या दारात तासन्तास उभे करण्यासाठी नव्हे!

समजा, अहिल्यानगर जिल्ह्यातील एखाद्या दुर्गम गावातील ७० वर्षांची महिला बसने शहरात येते. तिला स्मार्ट कार्ड काढायचे आहे. त्यासाठी आगारात रांग, आधार जोडणी, बायोमेट्रिक, ओटीपी... एखाद्या टप्प्यावर सर्व्हर बंद पडला तर? कार्ड तयार झाले तरी रिचार्जची अडचण आली तर? तांत्रिक कारणाने कार्ड स्वीकारले गेले नाही तर? शेवटी तिच्या हातात काय उरते? सवलतीऐवजी पूर्ण तिकीट आणि पुन्हा आगाराच्या चकरा!

ही परिस्थिती 'डिजिटल महाराष्ट्रा'ची प्रगती म्हणायची की डिजिटल व्यवस्थेच्या नावाखाली सामान्य नागरिकांची परीक्षा?

एसटी महामंडळ आर्थिक अडचणीत आहे, हे वास्तव आहे. सामाजिक बांधीलकीमुळे अनेक तोट्याचे मार्ग सुरू ठेवावे लागतात. सरकार विविध सवलतींची रक्कम महामंडळाला प्रतिपूर्ती म्हणून देते. त्यामुळे एसटीचा आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी सरकारने दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे.

मात्र, महामंडळाचा आर्थिक तोटा भरून काढण्याची जबाबदारी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या खिशावर टाकणे हा त्यावरील उपाय ठरू शकत नाही.

एनसीएमसी कार्डच्या माध्यमातून डिजिटल तिकीट व्यवस्था सक्षम करायची असेल तर आधी प्रत्येक आगारातील तांत्रिक यंत्रणा सक्षम करा. सर्व्हर, इंटरनेट, बायोमेट्रिक, कार्ड रिचार्ज यांची सुविधा सुरळीत करा. ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी मदत कक्ष उभे करा. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जोपर्यंत डिजिटल व्यवस्था शंभर टक्के सक्षम होत नाही, तोपर्यंत पर्यायी पद्धतीने सवलत देणे सुरू ठेवा.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक गावांमधून महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक रोज एसटीने प्रवास करतात. जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा आहे. अनेक गावांसाठी एसटी ही केवळ सोय नसून गरज आणि जगण्याचा आधार आहे.

त्यामुळे मुंबई-पुण्यासारख्या शहरातील डिजिटल सुविधा आणि अहिल्यानगरच्या दुर्गम ग्रामीण भागातील वास्तव यांची तुलना करून निर्णय घेता येणार नाही. गावातील इंटरनेटची उपलब्धता, वृद्धांची तंत्रज्ञानाशी असलेली ओळख, आगारापर्यंतचे अंतर आणि आर्थिक परिस्थिती या सगळ्यांचा विचार करावा लागेल.

एसटीला आधुनिक करणे आवश्यक आहे. डिजिटल तिकीटव्यवस्था, एनसीएमसी कार्ड, कॅशलेस व्यवहार हे काळाची गरज आहे. पण या आधुनिकतेच्या प्रक्रियेत ज्यांच्यासाठी सवलत जाहीर केल्या, त्यांनाच त्रास होत असेल तर त्या योजनेच्या उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण होते.

सरकारने लोकप्रिय घोषणा करण्यापेक्षा त्यांची सुलभ, पारदर्शक आणि सर्वसमावेशक अंमलबजावणी करण्यावर भर द्यावा. एनसीएमसी कार्डची सक्ती तातडीने शिथिल करून संक्रमण काळात आधार कार्ड किंवा अन्य पर्यायी पद्धतीने सवलत सुरू ठेवावी.

कारण शेवटी प्रश्न केवळ एका कार्डाचा नाही; प्रश्न आहे तो हजारो महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांच्या सन्मानाचा..!

# वैजापूरची राजकीय दिशा ठरली पण नेत्यांच्या दिशा मात्र वेगवेगळ्या ! जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : स्थानिक राजकारणात सध्या चांगलीच रंगत पाहायला मिळत आहे. एका रुग्णालयाच्या उद्घाटनानिमित्त वैजापूर दौऱ्यावर आलेले जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या खास शैलीत स्थानिक नेत्यांची चांगलीच कानउघाडणी केली.

वैजापूर तालुका दुष्काळमुक्त करण्यासाठी निधीची कोणतीही कमी पडू देणार नाही, असा जोरदार शब्द त्यांनी दिला खरा, पण त्याचवेळी स्थानिक नेत्यांच्या 'दिशा' वेगवेगळ्या झाल्या आहेत, असा सणसणीत टोलाही लगावला.

कार्यक्रमाच्या मंचावर आमदार प्रा. रमेश बोरनारे, नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी आणि जिल्हा परिषद सदस्य संजय निकम हे सर्व मातब्बर नेते एकाच छताखाली एकत्र दिसले. मात्र, वरवर कितीही गोड गोड दिसत असले तरी गेल्या विधानसभा आणि पालिका निवडणुकीपासून आमदार बोरनारे आणि डॉ. परदेशी यांच्यात छत्तीसचा आकडा असल्याचे संपूर्ण वैजापूर तालुक्याला ठाऊक आहे. त्यातच जिल्हा परिषद निवडणुकीच्या गणितांनी येथील राजकारण आणखीनच चुरशीचे करून ठेवले आहे.

याच पार्श्वभूमीवर विखे पाटलांनी अचूक नब्ज पकडत मंचावरूनच सर्वांना एकत्र येण्याचा सल्ला दिला. पाण्याचा प्रवाह कोणत्या दिशेने न्यायचा हे आपण ठरवू शकतो, परंतु नेत्यांचे राजकारणच वेगवेगळ्या दिशांना चालले आहे, असे म्हणत त्यांनी उपरोधिक चिमटे काढले. दुष्काळमुक्तीच्या मुद्द्यावर राजकीय जोडे बाजूला सारून सर्वांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. आता विखे पाटलांच्या या दिलखुलास आणिचकित करणाऱ्या टोमण्यानंतर वैजापूरचे हे दिग्गज नेते खरोखरच आपले मतभेद विसरून एकत्र येतात की त्यांच्यातील राजकीय शीतयुद्ध असाच रंग दाखवत राहते, हे पाहणे कमालीचे ठरणार आहे.

# कृषी शिक्षणातून मोठे व्यावसायिक, कृषी उद्योजक घडतील

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे; गणेशखिंड संशोधन केंद्राला भेट



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** अनुभवावर आधारित कृषी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन, उद्योजकतेची क्षमता आणि प्रत्यक्ष काम करण्याचा आत्मविश्वास विकसित होतो. या अनुभवातून भविष्यात मोठे व्यावसायिक, कृषी उद्योजक तसेच प्रगतिशील शेतकरी घडतील, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

पुणे येथील विभागीय कृषी संशोधन केंद्र, गणेशखिंड येथे कृषिमंत्री भरणे यांनी भेट देऊन केंद्रातील विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी २२७ वर्षे जुन्या ऐतिहासिक पेशवेकालीन आंब्याची पाहणी केली. तसेच आधुनिक रोपवाटिका, जैवविविधता वारसा केंद्र आणि कृषी पदवी अभ्यासक्रमांतर्गत अनुभवाधारित कृषी शिक्षणातून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध कृषी उत्पादनांच्या प्रदर्शनास भेट दिली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भरणे यांनी आई-वडील, शिक्षक व प्राध्यापकांचा नेहमी मान राखण्याचे आवाहन केले. ज्यांनी आपल्याला घडविले, त्यांना कधीही विसरू नका. जीवनात आनंद द्या आणि आनंद घ्या, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी गणेशखिंड संशोधन केंद्राच्या कृषी संशोधनातील योगदानाची माहिती दिली. विद्यापीठाने विकसित केलेल्या भगवा डाळिंब वाणाखाली महाराष्ट्रातील सुमारे ४३ टक्के क्षेत्र असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास तुषार पवार, डॉ. सुभाष भालेकर, डॉ. भरत पाटील, डॉ. दत्तात्रय लाड यांच्यासह शास्त्रज्ञ, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. ज्योती यादव यांनी केले.

# द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये शिक्षक दिन, गोकुळाष्टमी उत्साहात

## अध्यक्ष जयराज दंडवते यांचा वाढदिवसही उत्साहात साजरा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये शिक्षक दिन, गोकुळाष्टमी तसेच संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत मनोगते, भाषणे व सुंदर कविता सादर केल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून वर्गात अध्यापनाचा अनुभव घेतला. या उपक्रमातून शिक्षकांच्या जबाबदाऱ्या, मेहनत तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील शिक्षकांचे योगदान याची विद्यार्थ्यांना जाणीव झाली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना त्यांच्या नावाच्या ट्रॉफी, गुलाबपुष्प तसेच शाळेसाठी साईबाबांची प्रतिमा भेट देऊन कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी मार्गदर्शन करताना अध्यक्ष जयराज दंडवते म्हणाले की, शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देऊन उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करतात. विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, भारतीय संस्कृती व परंपरांची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी आणि सणांचे महत्त्व समजावे या उद्देशाने द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये गोकुळाष्टमीही उत्साहात साजरी करण्यात आली. भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी राधा, कृष्ण, गोप व गोपी यांच्या आकर्षक वेशभूषा करून कार्यक्रमात सहभाग घेतला. शाळा व महाविद्यालयाचा परिसर रंगीबेरंगी सजावट आणि श्रीकृष्णाच्या विविध प्रतिकृतींनी सजविण्यात आला होता.

विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित गीते, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. श्रीकृष्णाच्या बाललीला, व्यक्तिमत्त्व, जीवनमूल्ये तसेच भगवद्गीतेतील संदेश याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रेम, मैत्री, कर्तव्य, सत्य व धर्म या मूल्यांचे महत्त्वही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.यानंतर पारंपरिक पद्धतीने दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. दहीहंडीचा प्रसाद सर्व विद्यार्थ्यांना वाटण्यात आला.

या दोन्ही कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव, संघभावना, शिस्त, एकोपा तसेच शिक्षकांप्रती आदर आणि कृतज्ञतेची भावना वृद्धिंगत झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या अनिता रोहोम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी द्रोणा अकॅडमीच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राहुरी फॅक्टरीत संतसेना महाराज पुण्यतिथी साजरी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : संतश्रेष्ठ संतसेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने राहुरी फॅक्टरी येथील सकल नाभिक समाजाच्यावतीने संतसेना महाराज यांना अभिवादन करत पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

तालुक्यातील गुहा येथील गंगाधर बाबा छात्रालय येथे श्री व सौ संदीप वाघचौरे यांच्या हस्ते संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करत महाप्रसादाचे आयोजन सकल नाभिक समाजाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी नाभिक संघटनेचे राहुरी फॅक्टरी शहराध्यक्ष ऋषी राऊत, आश्रमाचे व्यवस्थापक पप्पू सपकाळ, चांगदेव पवळे,व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनील विश्वासराव,सूर्यकांत कोरडे,सुदाम पवळे, उद्धव राऊत,संतोष राऊत,विजय सोनवणे,श्रीकांत अनारसे,आसाराम राऊत, आप्पा थोरात,सोमनाथ आहेर,अनिल वाघमारे,रवींद्र औटी,आदिनाथ गायकवाड,दत्तात्रय राऊत, सचिन वाघमारे, बबलू गायकवाड,महेश पवळे, संदीप साळुंके, तुषार राऊत,यश आहेर,वेदांत विश्वासराव,अभि राऊत,मयूर राऊत आदिंसह बहुसंख्य महिला भगिनी व नाभिक समाजबांधव उपस्थित होते.

# श्रीरामपूरात संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहर नाभिक संघटनेच्या वतीने श्री संत सेना महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील नाभिक समाजबांधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संत सेना महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

श्रीरामपूर शहर नाभिक संघटनेचे अध्यक्ष गोपाल वसंतराव लिंगायत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास श्रीरामपूर नगरपालिकेचे नगरसेवक दीपकराव वमने पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नगरपालिकेचे उपमुख्य अधिकारी तापकिरे साहेब, सुभाषराव लिंगायत, सुभाषदादा महाले, यादव काका बिडवे, अशोकराव वाकचौरे, एकनाथराव लिंगायत, सुभाष विळस्कर, रमेशराव निकम, अशोकभाऊ कोरडे, संघटनेचे माजी अध्यक्ष दिलीपराव विळस्कर, माजी उपाध्यक्ष किशोरभाऊ शिंदे, दीपकराव गायकवाड, बंडोपंत सोनवणे, संपतराव भागवत, आहेर काका, बाळासाहेब वाकचौरे, माजी अध्यक्ष कैलासराव भागवत, राहुल बिडवे, संतोष आवटी, दत्तात्रय नेरपगार, गोरखभाऊ वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संत सेना महाराजांच्या विचारांचे स्मरण करून समाजातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वाढविण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमास नाभिक समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# १५ वर्षांच्या जुनाट भगंदरातून रुग्णाला जीवदान

## डॉ. गोरे यांच्या उपचाराने चमत्कार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : अहिल्यानगर येथील एका रुग्णाची १५ वर्षांची वेदना राहाता येथे संपली आहे. गेल्या १४ ते १५ वर्षांपासून अत्यंत गुंतागुंतीच्या आणि त्रासदायक कॉम्प्लेक्स फिस्टुला इन एनो (भगंदर) आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णावर राहाता येथील साई अभिनव मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक तथा प्रसिद्ध कोलोप्रोक्टोलॉजिस्ट डॉ. किरण गोरे (MBBS, MS) यांनी यशस्वी उपचार करून त्यांना ठणठणीत बरे केले आहे. अहिल्यानगर येथील रहिवासी असलेले झोडगे साहेब गेल्या अनेक वर्षांपासून या आजाराने त्रस्त होते. या प्रदीर्घ काळात त्यांनी अहिल्यानगर, सोलापूर, पुणे आणि मुंबई येथील नामांकित रुग्णालयांमध्ये उपचार घेतले. लेझर शस्त्रक्रिया, क्षारसूत्र, ओपन फिस्टुलेक्टॉमी अशा जवळपास ५ ते ६ वेळा विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया त्यांच्यावर करण्यात आल्या. मात्र, त्यांच्या त्रासात काडीचाही फरक पडला नाही. एलोपॅथीसोबतच त्यांनी युनानी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी आणि गावरान औषधोपचारांचाही आधार घेतला, परंतु सर्वच उपचार निष्फळ ठरले. त्यांची अवस्था इतकी बिकट होती की, जखमेतून सतत येणारा पू पुसण्यासाठी त्यांना दररोज एक संपूर्ण कॉटन बंडल लागत असे. सततच्या अपयशामुळे त्यांचा वैद्यकीय उपचारांवरील विश्वासच उडाला होता. अशा निराशाजनक परिस्थितीत त्यांच्या मानलेल्या मुलाने आग्रह धरून त्यांना राहाता येथील साई अभिनव हॉस्पिटलमध्ये डॉ. किरण गोरे यांच्याकडे आणले. सुरुवातीला ''मुंबई-पुण्यातील मोठ्या डॉक्टरांकडे बरे झालो नाही, तर राहात्यात काय होणार?'' अशी शंका रुग्णाच्या मनात होती. मात्र, डॉ. गोरे यांनी रुग्णाची तब्बल ३०० ते ४०० पानांची जुनी फाईल आणि सर्व वैद्यकीय अहवालांचा अत्यंत सखोल अभ्यास केला. रुग्णाची सद्यस्थिती तपासून त्यांनी अचूक निदानावर आधारित विशेष औषधोपचार आणि मार्गदर्शन सुरू केले.या उपचारांचा चमत्कारिक परिणाम अवघ्या १५ दिवसांतच दिसून आला. वर्षानुवर्षे सुरू असलेला पू येण्याचा त्रास पूर्णपणे थांबला असून रुग्णाचे दुखणेही बंद झाले आहे. या उपचारादरम्यान रुग्णाच्या तब्येतीत लक्षणीय सुधारणा होऊन त्यांचे वजन ८ ते ९किलोने वाढले असून ते आता पूर्णपणे निरोगी झाले आहेत. बरे झाल्यानंतर झोडगे साहेब यांनी स्वतः रुग्णालयात येऊन डॉ. गोरे यांचे आभार मानले. यावेळी त्यांच्या कुटुंबीयांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, ''अमेरिका, मुंबई किंवा पुणे येथील मोठ्या डॉक्टरांकडे जितके ज्ञान आणि कौशल्य आहे, तितकेच किंबहुना त्यापेक्षा जास्त ज्ञान, अनुभव आणि रुग्णांविषयीची आपुलकी ग्रामीण भागातील डॉक्टरांकडेही आहे.''या यशस्वी उपचारामुळे जटिल आणि जुनाट भगंदराच्या रुग्णांसाठी नवी आशा निर्माण झाली आहे. संपर्क : साई अभिनव मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, राहता. मो. ९४०५०००४५४ / ९२७०२४५२५४

# साई निर्माण ग्रुप सेवाभावी परदेशयात्रा अद्वितिय !!

## दिड हजार भाविकांना घडविली तीर्थ क्षेत्राची सुखरूप यात्रा !

श्रीरामपूर :- देशभरात आणि महाराष्ट्रात अनेक तीर्थयात्रा घडवणाऱ्या खाजगी कंपन्या आहेत. सेवाभावी उद्देशाने काढलेली दीड हजार भाविकांची प्रचंड मोठी तीर्थयात्रा शिर्डीच्या साई निर्माण ग्रुपने नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच युवा नेते मा. खासदार सुजय दादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाने तसेच साई निर्माण ग्रुपचे सर्वेसर्वा विजयराव कोते पाटील, मा नगराध्यक्ष कैलासराव उर्फ बापू कोते पा. आणि त्यांच्या अनेक सेवाभी नेते , कार्यकर्त्यांच्या परिश्रमाने यंदाची १३ वी साई पारायण तिर्थयात्रा संपन्न झाली.यंदाची यात्रा परदेश वारी घडविणारी ठरली भारताच्या लगत असलेला जगाचा पाठीवरील हिंदू राष्ट्र म्हणून ओळख असलेला नेपाळ येथे ही यात्रा स्पेशल रेल्वेने तसेच आरामदायक बसेसने आयोजित करण्यात आलेली होती. या महायात्रेत श्रीक्षेत्र काशी, आयोध्या, नेपाळमधील पशुपतीनाथ मंदीर तसेंच पर्वतराजी मधील उत्युच्च शिखरावरील मनकामना देवीमाता मंदीर यांचा प्रामुख्याने समावेश होता.

यात्रेसाठी वातानुकुलित व शयनयान डब्यांसह एकोणावीस डब्यांची स्पेशल ट्रेन सर्व सुविधांसह बुक करण्यात आली होती. ट्रेन मध्ये जागेवरच नाष्टा , भोजन देण्याची सोय होती.प्रवासात कुणी यात्रेकरू आजारी पडल्यास प्रथमोपचार देण्यासाठी डॉक्टरांची टीम सुद्धा तैनात होती त्याचा अनेकांना लाभ झाला. रस्ता प्रवासासाठी २ २ आरामदायक बसेस ची सुविधा होती. मुक्कासाठी अंथरुण-पांघरुणांसह स्वच्छ होटेले बुक करण्यात आली होती. पुरेशी विश्रांती घेऊन पुढच्या प्रवासाचा टप्पा सहज पार पडत होता. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्याच्या मध्यावरअंतिम टप्प्यात नेपाळ मध्ये अचानक आलेल्या महापुरात पूर्वभाग प्रचंड क्षतिग्रस्त झाला. त्यात प्रचंड प्रमाणात नेपाळमधील जनतेची वित्त व जिवीत हानी झाली. अनेकजण बेपत्ता झाले. एवढे प्रचंड नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही यात्रा नेणे हा धाडसाचा मोठा प्रयोग होता. नामदार राधाकृष्ण विखे पाटील, युवानेते व कणरवर नेतृत्व असलेले मा. खा. सुजय दादा विखे पाटील, विजयभाऊ कोते पा. यांनी नियोजित तिर्थयात्रा नेऊन यशरची केली ही त्यांच्या स्पष्ट धोरणाची साक्ष देते. पावसाळी वातावरण आणि गाडीला होणाऱ्या विलंबामुळे नेपाळमधील कठीण शिखरावर असलेल्या माता मनकामना देवी दर्शन होणार की नाही असे वाटत असतांनाच शक्रवारी ४ सप्टेंबर रोजी रात्री माता मनकामना दर्शनाला जायचा संदेश सर्वांना आला. शनिवारी ५ सप्टेंबर रोजी चाळीस बसेसचा ताफा माता मनकामना मंदिराकडे निघाला.

काठमांडू येथे सुजय दादा विखे पाटील त्यांच्या कार्यकर्त्यांसह पशुपतीनाथ मंदिराच्या परिसरात आले त्या ठिकाणी उदारपणे खर्च करून सहाय्य करणाऱ्या मान्यवरांचा त्यांनी सत्कार केला सुजय दादा विखे पाटील हे शेवटपर्यंत संपूर्ण यात्रेवरती नियंत्रण ठेवून होते

माता मनकामना मंदीर हे शहिद लखन मा उ पालिका गोरखा यांच्या क्षेत्रात येते. दोन प्रचंड पहाडाच्या मधून वेगाने नदी वाहते. नदी ओलांडून समोरच्या सुमारे तीनहजार फूट उंचीवर मंदिर आहे. मंदीराकडे जाण्यासाठी मोठा रोप वे उभारण्यात आला आहे. यात्रेतील भाविकांनी दर्शनाचा लाभ घेऊन मुक्काच्या ठिकाण गाठले. गाडीत टाळ-मृदुंग व भजनीमंडळ होते त्याचप्रमाणे साईबाबांची पालखी सुद्धा देण्यात आली होती पहिल्या दिवशी साईबाबाच्या पालखीची मोठी मिरवणूक शहरातून काढण्यात आली आणि विश्वनाथाच्या मंदिराकडे मार्गस्थ झाली वाटेत अधून-मधून पाऊस पडत होता तरीही सर्व भाविक आनंदाने नाचत कुदत मंदिराकडे गेले तेथे विश्वनाथाचे मंदिर पाहून सर्वांना आनंद वाटला . दर्शन झाले.भाविकांनी कालभैरवाचे व अन्य देवळात जाऊन दर्शनाचा लाभ घेतला गंगेला प्रचंड पूर असल्यामुळे छोट्या मोठ्या सर्वच होड्या बंद होत्या कुणालाही पाण्याला स्पर्श करायला परवानगी नव्हती रात्री गंगा आरतीसाठी सुद्धा लोक जमले परंतु होड्या बंद असल्याने कुणालाही गंगेच्या आरती पर्यंत जाता आले नाही नदीच्या प्रवाहाला प्रचंड वेग होता.

वाराणशीहून अयोध्येकडे सर्व भाविकांचा ताफा ट्रेनने निघाला पाऊस होता तेथे दर्शनाची चांगली व्यवस्था शासनाकडून करण्यात आली आहे.श्री रामाचे दर्शन दरबाराचे दर्शन हनुमान घडीचे दर्शन भाविकांनी आपापल्या परीने घेतले .परतीचा प्रवास शुक्रवारी रात्री ठरलेला होता तथापि एक दिवसाने नियोजन वाढल्याने शनिवारी रात्री शिर्डी कडे नैतनवा हून रेल्वे प्रवास सुरु झाला. श्रीक्षेत्र पुणतांबा येथे गाडी आल्यावर विजयभाऊ कोतेंनी अनेक भाविकांबरोबर जयघोष करीत वाद्यांच्या तालावर मनमुराद फेर धरला.सुमारे एक तासाने गाडी शिर्डी कडे निघाली.

नमन
श्री. पद्माकर शिंपी
मो.९४२३७८५८७४

# संगमनेरमला विश्व हिंदूपरिषद आणि बजरंग दलाच्या दहीहंडीचा थरार

## १,११,१११ रुपयांच्या बक्षिसांची लयलूट



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : विश्व हिंदू परिषदेच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून संगमनेर शहरात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि दुर्गावाहिनी-मातृशक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली भव्य दहीहंडी आमदार अमोल खताळ पाटील यांच्यासह हजारो नागरिकांच्या उपस्थितीत प्रचंड उत्साहात पार पडली. थरारक कसरती, ढोल-ताशांचा दणदणाट, भगव्या ध्वजांची उधळण आणि तब्बल १ लाख ११ हजार १११ रुपयांच्या रोख बक्षिसांची लयलूट यामुळे हा सोहळा संगमनेरकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

संगमनेर बसस्थानकासमोरील दत्तमंदिर परिसरात या महोत्सवाला दिमाखात सुरुवात झाली. 'छावा ढोल-ताशा ध्वज पथका'च्या दणदणाटाने आणि फडकणाऱ्या भगव्या ध्वजांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर 'जाणता राजा प्रतिष्ठान' यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या लाठी-काठी, तलवारबाजी तसेच शिवकालीन मर्दानी खेळांच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. या प्रात्यक्षिकांना नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. ३० फूट उंचीवरील बासरी अन् मानाची दहीहंडीया महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरली ती जमिनीपासून तब्बल ३० फूट उंचीवर उभारण्यात आलेली १४ फूट लांबीची देखणी बासरी आणि त्यावर टांगण्यात आलेली मानाची दहीहंडी. ही दहीहंडी फोडण्यासाठी विविध गोविंदा पथकांमध्ये चुरशीची स्पर्धा रंगली. प्रत्येक पथकाने शिस्त, धाडस आणि कौशल्याचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली.

**मुलींच्या दहीहंडीने सलामी**

संगमनेरच्या इतिहासात प्रथमच मुलींच्या गोविंदा पथकाने दिलेली शिस्तबद्ध व धाडसी सलामी हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. विविध गोविंदा पथकांच्या सलामीवेळी करण्यात आलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे वातावरणातील उत्साह आणखी द्विगुणित झाला.

**बजरंग दल साकूर-मांडवे प्रथम**

अत्यंत चुरशीच्या झालेल्या दहीहंडी स्पर्धेत बजरंग दल साकूर-मांडवे (लक्ष्मीमाता मित्र मंडळ) यांनी प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले. तर मानाच्या सलामीचे विशेषपारितोषिक बजरंग दल साकूर-हिरेवाडी संघाने मिळविले. विजेत्या गोविंदा पथकांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. विजेत्यांना रोख रक्कम तसेच मानाची भव्य ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले.

या संपूर्ण दहीहंडी महोत्सवासाठी बजरंग दल, विश्व हिंदू परिषद तसेच बजरंगिनींनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दहीहंडी सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# संगमनेरच्या क्रीडा विकासाला चालना

## तीन कोटींच्या निधीतून विविध कामांना गती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. सन २०१२ नंतर क्रीडा समितीची एकही बैठक झाली नसल्याचे बैठकीत समोर आले. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्रीडाक्षमता असतानाही आवश्यक सुविधा, मैदाने आणि प्रशिक्षणाचा अभाव असल्याने त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. तीन कोटी रुपयांच्या निधी पैकी एक कोटी नगरपरिषदेकडे वर्ग करण्याबाबत क्रीडा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याची माहिती क्रीडा समितीचे अध्यक्ष तथा आमदार अमोल खताळ यांनी दिली.

शासकीय विश्रामगृहावर क्रीडा समितीची बैठक घेण्यात आली या बैठकीस मुख्याधिकारी दयानंद गोरे निवासी नायब तहसीलदार सुभाष कदम तालुका क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे सहाय्यक गट विकास अधिकारी राजेंद्र ठाकूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय



टेकाळे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांच्यासह क्रीडाशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. खताळ म्हणाले, तालुक्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी सन २०२१ मध्ये तीन कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

प्रस्ताव सादर केल्यानंतर निधी मंजूर होण्यासाठी काही कालावधी लागतो. महायुती सरकारच्या माध्यमातून हा तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीच्या कामात कोणत्याही प्रकारचे राजकारण केले नाही. तालुक्यातील खेळाडू आणि तरुणांच्या हिताला प्राधान्य दिले जाणार आहे.तीन कोटी रुपयांच्या निधीपैकी एक कोटी रुपये नगरपरिषदेकडे वर्ग करण्याबाबत क्रीडा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या निधीतून नगर परिषदेतर्गत बांधण्यात आलेल्या क्रीडा संकुलाच्या संरक्षक भिंतीचे काम तसेच बॅडमिंटन हॉल दुरुस्ती साठी हा निधी वापरण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**संगमनेरला लवकरच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात येणार**

आगामी काळात संगमनेर शहरात सर्व शासकीय विभागांमध्ये समन्वय ठेवून राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामुळे संगमनेरला क्रीडा क्षेत्रात नवी ओळख मिळेल. तसेच स्थानिक खेळाडूंना मोठ्या स्पर्धांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

**अमोल खताळ,**
**आमदार, संगमनेर विधानसभा**

शासनाच्या सन २०१६ च्या अध्यादेशानुसार क्रीडा संकुलाची धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी करण्याबाबतही क्रीडा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. क्रीडा संकुलाचे व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी काही पदांवर कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यास तसेच क्रीडा समितीमध्ये काही आमंत्रित सदस्यांचा समावेश करण्यास क्रीडा समितीचे अध्यक्ष या नात्याने मंजुरी देण्यात आली आहे.ग्रामीण भागातील खेळाडूंना सरावासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विस्तृत आणि अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्याचा मानस आहे. त्यासाठी किमान पाच ते दहा एकर जागेचा शोध घेण्याच्या सूचना महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. जागा निश्चित झाल्यानंतर आधुनिक सुविधांनीयुक्त क्रीडा संकुल उभारण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

संगमनेर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक गुणवान खेळाडू आहेत. मात्र, त्यांना योग्य प्रशिक्षण, मैदाने आणि आवश्यक क्रीडा सुविधा उपलब्ध होत नसल्याने त्यांची गुणवत्तेला योग्य वाव मिळत नाही. नव्या क्रीडा संकुलाच्या माध्यमातून विविध खेळांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करून स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देण्यावर भर दिला जाणार असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

द•ख•ल

## उक्कलगावात संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात



**उक्कलगाव** : संत शिरोमणी सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करत हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी तुळजाभवानी मंदिरात संत सेना महाराज आणि विठ्ठल-रुक्मिणी प्रतिमेस पंचामृत अभिषेक व आरतीने झाली. त्यानंतर प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी संत सेना महाराजांना अभिवादन केले. या सोहळ्यात उक्कलगाव ग्रामस्थ आणि नाभिक बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. देवस्थानचे विश्वस्त रविंद्र जगधने, अनिल थोरात, ग्रामपंचायत सदस्य शरद नानासाहेब थोरात, आप्पू थोरात, गुलाब गाडेकर, रविंद्र थोरात, पंडित जाधव, शिवाजी बोर्डे, पांडुरंग बोर्डे, रमेश बोर्डे, नंदू बोर्डे, गौरव बोर्डे, प्रशांत बोर्डे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांची पतियाळा येथे शैक्षणिक भेट



**प्रवरानगर** : डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या स्पोर्ट्स फिजिओथेरपी विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या राष्ट्रीय क्रीडा संस्था, पतियाळा येथे शैक्षणिक भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी क्रीडा विज्ञान, क्रीडा वैद्यक, फिजिओथेरपी व पुनर्वसन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान आणि कार्यपद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव घेतला, अशी माहिती प्राचार्य डॉ. आर. के. सिन्हा यांनी दिली. या शैक्षणिक भेटीस संस्थेचे विश्वस्त ध्रुव विखे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

तसेच क्रिडा संस्थेचे संचालक डॉ. सुनील बुलार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्पोर्ट्स फिजिओथेरपी विभागाचे प्रमुख डॉ. प्रदीप बोरकर यांनी या भेटीचे नेतृत्व केले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी थलेटिक्स, हॉकी, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बॉक्सिंग, कुस्ती, वेटलिफ्टिंग आणि तिरंदाजी अशा विविध क्रीडा प्रकारांतील प्रशिक्षण व कामगिरीविषयक बाबींची माहिती घेतली. उच्चस्तरीय खेळाडूंच्या प्रशिक्षण प्रक्रियेत क्रीडा विज्ञानाची भूमिका, शारीरिक क्षमता वाढविण्याच्या पद्धती तसेच दुखापतींचे प्रतिबंधात्मक व्यवस्थापन यांचा विद्यार्थ्यांनी जवळून अभ्यास केला.

## बाल गोपालांच्या उत्साहात दहीहंडी कार्यक्रम उत्साहात

**श्रीरामपूर** : जानकीबाई वामनराव आदिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खानापूर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त बाल गोपाल दहीहंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदात संपन्न झाला. या कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने व उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. दहीहंडी फोडण्यासाठी विद्यार्थ्यांनी मानवी मनोरा रचत मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. दहीहंडी फोडताच विद्यार्थ्यांनी जल्लोष करून आपला आनंद व्यक्त केला. यामुळे विद्यालय परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये एकजूट, संघभावना, सहकार्य, धाडस व परस्पर सहकार्याची भावना विकसित होण्यास मदत झाली. कार्यक्रमास प्राचार्य बाबासाहेब गवारे, प्राध्यापक दांडगे तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## यूजीसी नेट परीक्षेत अनुष्का शेलार उत्तीर्ण



**अहिल्यानगर** : भारत सरकारच्या युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन (UGC) तर्फे, नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) मार्फत घेण्यात येणारी यूजीसी नेट परीक्षा कुमारी अनुष्का बाबासाहेब शेलार यांनी उत्तीर्ण होऊन प्राध्यापक पदासाठी पात्रता मिळवली आहे.अनुष्का यांनी महाराष्ट्रातील नामांकित व सर्वात जुन्या विधी महाविद्यालयांपैकी एक असलेल्या आय.एल.एस. लॉ कॉलेज पुणे मधून एल.एल.बी.चे शिक्षण पूर्ण केले असून, भारतातील अग्रगण्य असलेले नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, संभाजीनगर मधून एल.एल.एम. पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली आहे. भारत सरकारतर्फे त्यांची कर्नाटक उच्च न्यायालय, बंगळूरू येथे इंटर्नशिपसाठी निवड झाली होती. तसेच त्यांनी अहिल्यानगर न्यायालयातही इंटर्नशिप पूर्ण केली आहे. सध्या त्या विधी सेवा अधिकारी पदासाठी तयारी करीत आहेत. अनुष्का शेलार या महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त बाबासाहेब शेलार व स्मिता बाबासाहेब शेलार यांच्या कन्या व सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शेलार यांच्या भगिनी आहेत.

## दहीहंडी फोडून अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : मांडव्य ऋषींच्या पावन भूमी श्री क्षेत्र मांडवे खुर्द (ता. पारनेर) येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प. गुरु ज्ञानेश्वर महाराज कदम (मोठे माऊली) यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. संत माणिक गिरीबाबा व धनाजीबाबा गागरे यांच्या कृपाशीर्वादाने तसेच नाथाबाबा गागरे व सावळा हरी गागरे यांच्या प्रेरणेतून श्रीकृष्ण जयंती व संत ज्ञानेश्वर महाराज जयंतीनिमित्त हनुमान मंदिराच्या प्रांगणात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. काल्याच्या कीर्तनातून ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम यांनी भगवान श्रीकृष्णाच्या अवताराचे महत्त्व विशद केले. धर्माला आलेली ग्लानी दूर करून जगाच्या उद्धारासाठी श्रीकृष्णाचा अवतार झाल्याचे सांगत त्यांनी गोकुळातील बाललीला व विविध प्रसंगांचे रसाळ वर्णन केले. सर्व जाती-धर्मातील सवंगड्यांना सोबत घेऊन श्रीकृष्णाने केलेल्या लीला राष्ट्रीय एकता, समता व बंधुभावाचा संदेश देतात, असे त्यांनी सांगितले. यानंतर पुष्पांनी सजविलेली दहीहंडी ह.भ.प. चांगदेव महाराज जाधव व ह.भ.प. रोहिदास महाराज हारदे यांच्या हस्ते ग्रामस्थ व सप्ताह समितीच्या वतीने फोडण्यात आली. यावेळी 'गोपाल कृष्ण भगवान की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. सप्ताहात योगदान देणाऱ्या दाम्पत्यांचा महाराजांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमानंतर ग्रामस्थ व सप्ताह समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## 'एक गाव एक गणपती'साठी प्रयत्न करा : पोलीस अधिक्षक सुदर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा ही श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींची पुण्यभूमी असल्याने नेवासा तालुक्यात 'एक गाव एक गणपती' संकल्पनेनुसार गणेशोत्सव साजरा होण्यासाठी पोलीस पाटलांनी प्रयत्न करावेत असे आवाहन पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले. नेवासा येथील नेवासाफाटा रस्त्यावरील पावन गणपती समोरील लक्ष्मी मंगल कार्यालयात आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधिक्षक सुदर्शन हे बोलत होते. शांतता कमेटी, गणेश उत्सव मंडळ अध्यक्ष, सदस्य, पोलीस पाटील यांची बैठक पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु, तहसीलदार डॉ.संजय बिरादार, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, महाविरणचे उपविभागीय अभियंता राहुल बडवे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,अँड.संजय सुखधान,शाखा अभियंता वैभव कानडे,माजी सरपंच सतीष निपुंगे, नगरपंचायतचे कार्यालयीन अधिक्षक सागर झावरे आदी मान्यवर उपस्थितहोते. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. भाजपा मंडलाध्यक्ष मनोज पारखे, अशोक डहाळे, स्वप्निल मापारी, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी मनोगत व्यक्त केले. पोलीस अधीक्षक सुदर्शन म्हणाले की नेवासा तालुका ही श्री संत ज्ञानेश्वराची पुण्यभूमी आहे त्यामुळे तुम्हा आदर्श इतरांनी घ्यावा. लोकमान्य टिळक यांनी ज्या उद्देशातून श्री गणेश उत्सव सुरु केला त्याप्रमाणे उत्सव साजरा करा. समाजाला एकत्र येण्यासाठी 'एक गाव एक गणपती' संकल्पना राबविण्यासाठी पोलीस पाटील यांनी प्रयत्न करावे.

श्री गणेश उत्सवाचा आनंद घ्या व इतरांनाही द्या, नियमाचे पालन करून उत्सव साजरा करण्यात यावा. दुर्घटना घडण्यासाठी एक क्षण असतो तो टाळून चांगले कसे होईल यासाठी काम करा. कायद्याचे पालन करा असे आवाहन करून पालन न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. नशामुक्ती अभियानात सहभागी व्हा, त्याचे देखावे, फ्लेक्स बोर्ड, वकृत्व स्पर्धा घ्या जनजागृती करा अशाही सूचना केल्या. पारंपारिक मार्गाने मिरवणूक काढा, प्रवरा नदी पवित्र नदी असून ती प्रदूषित करु नका. ध्वनी प्रदुषण मुक्त गणेश उत्सव साजरा करा. तरुण पिढीला वाटते वर्षातून एकच उत्सव येतो. डिजे वाजवू. डिजेच्या आवाजामुळे नागरीकांना हार्ट अँटॅकच्या घटना घडल्या आहेत.

घरातील वृद्ध व्यक्ती, लहान मुलांना आवाजाचा त्रास होतो. डिजे वाजल्यास कारवाई होईल. होईल. त्यामुळे तुम्ही पारंपारिक वाद्य वाजवा. आम्ही तुमच्यासाठी काम करतो सांस्कृतिक कार्यक्रम घ्या. नेवासा तालुक्याचे नाव मोठे होईल असे काम करा असे आवाहन केले.

बैठकीस शिवसहकार सेनेचे बालेंद्र पोतदार,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संतोष गव्हाणे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बाळासाहेब कासार, पोलीस पाटील बाळकृष्ण भागवत,राम शिंदे,अँड. अंजली काळे, मिनाक्षी रिंधे, स्मिता लवांडे, साधना काळे, स्वाती घोरपडे, मंगल सांवत, निरंजन डहाळे, नगरपंचायत गटनेते महेश लोखंडे, अनिल शिंदे, कृष्णा परदेशी, संदीप सरकाळे, जालिंदर गवळी, नितीन खंडाळे, सुनील परदेशी, प्रशांत बहिरट, मनोज हापसे, दीपक धोत्रे, जयदीप जामदार, स्वप्निल कडपे, अभिषेक शेजुळ, विशाल शेजुळ यांच्यासह मंडळाचे अध्यक्ष व सदस्य, पोलीस पाटील उपस्थित होते. पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर अँड.संजय सुखदान यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, शिस्त व योग्य कृती आवश्यक : दत्ता रोकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती प्रत्यक्षात साकार करण्यासाठी आजपासूनच कृतीला सुरुवात करावी. बदलत्या कॉर्पोरेट विश्वात केवळ पदवी पुरेशी नसून आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन, प्रभावी संवादकौशल्य, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सातत्यपूर्ण कौशल्यविकास आवश्यक आहे, असे प्रतिपादन कॉर्पोरेट ट्रेनर दत्ता रोकडे यांनी केले. पायरेन्स आय.बी.एम.ए. येथे एमबीए, एमसीए व बी. व्होक. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित इंडक्शन प्रोग्राम २०२६ मध्ये ते बोलत होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दत्ता रोकडे यांनी.मोठे स्वप्न पाहणे ही यशाची पहिली पायरी आहे; मात्र ते स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, शिस्त आणि योग्य कृती आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना अपयशाला घाबरू नये, तर प्रत्येक अपयशातून शिकून पुढे जाण्याचा सल्ला दिला. आजच्या स्पर्धात्मक युगात उद्योगविश्वाच्या गरजा वेगाने बदलत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी मिळविण्यावर समाधान न मानता स्वतःला 'उद्योगविश्वासाठी सज्ज' बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे रोकडे यांनी सांगितले.

## 'नदीजोड'चे गाजर दाखवून निळवंडेचे पाणी पळवू नका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : भोजापूर पूरचारीचा नुकताच नदीजोड प्रकल्पात समावेश केल्याची घोषणा पालकमंत्र्यांनी केली आहे. या निर्णयाला भोजापूर पूरचारी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचा कोणताही विरोध नाही. उलट, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे आम्ही स्वागत आणि समर्थन करतो. मात्र, सरकारने यापूर्वी जाहीर केलेले अनेक महत्त्वाकां प्रकल्प अद्याप पूर्णत्वास गेलेले नाहीत. सुरत-अहमदाबाद महामार्ग, शक्तिपीठ महामार्गासह विविध प्रकल्पांची कामे रखडलेली आहेत. त्याचबरोबर हजारो कोटी रुपयांची कंत्राटदारांची देयके प्रलंबित असल्याचे चित्र आहे. फक्त घोषणाबाजी होते प्रत्यक्षात कोणतेही काम सुरू होत नाही.



संगमनेर तालुक्यातही खूप निधी आल्याच्या बातम्या येतात मात्र एकही काम सुरू होत नसल्याने नदीजोड प्रकल्प प्रत्यक्षात कधी पूर्ण होणार, याबाबत शेतकऱ्यांच्या मनात साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळे भविष्यातील प्रकल्पाचे गाजर दाखवून स्थानिक शेतकऱ्यांना निळवंडेच्या हक्काच्या पाण्यापासून वंचित ठेवू नका, अशी भूमिका लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत बोलताना बी आर चकोर म्हणाले की, भोजापूर पूरचारीचा नदीजोड प्रकल्पात समावेश करण्याच्या निर्णयाला आमचा विरोध नाही. मात्र, गेल्या ३० ते ४० वर्षांपासून अनेक पिढ्यांनी या प्रकल्पाची प्रतीक्षा केली. आता निळवंडे धरणाचे पाणी पाटातून वाहताना दिसत आहे.

हे पाणी आपल्या ताटाजवळ आले असून, केवळ ते आपल्या शेतात पोहोचणे बाकी आहे. निळवंडे धरणाच्या पाण्याची प्रतीक्षा करणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा पाणीवाटा प्रथम मिळाला पाहिजे. निळवंडेचे पाणी पाटातून वाहत असताना स्थानिक पाईपलाईनचे काम रखडविणे योग्य नाही. भविष्यातील नदीजोड प्रकल्प पूर्ण होण्यासाठी किती वर्षे लागतील, याची निश्चितता नसताना सध्याचे उपलब्ध पाणी अन्यत्र वळविण्याचा प्रयत्न करू नये.

तर सचिन दिघे म्हणाले की नदीजोड प्रकल्प करा, पण स्थानिक शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्याची किंमत मोजून नाही, अशी स्पष्ट भूमिका भोजापूर पूरचारी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी घेतली आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी अनंत अडचणीवर मात करून निळवंडे धरण व डावा आणि उजवा कालवा पूर्ण केला त्यामुळे दुष्काळी भागात पाणी आले आहे. मात्र हे पाणी नदीजोड प्रकल्पाच्या नावाखाली पुढे नेले जात आहे किंबहुना निळवंडे च्या पाण्यावरून लक्ष विचलित करण्यासाठी असे गाजर दाखवले जात आहे. विकास कामांना आमचा कोणताही अडथळा नाही मात्र संगमनेर तालुक्यात सुद्धा एकही काम होत नाही. असे असताना निळवंडे चे पाणी आम्हाला राहू द्या नदीजोड प्रकल्प करा पण सध्या हक्काचे पाणी पळू नका असे आवाहन त्यांनी केले.

तर सुभाष सांगळे म्हणाले की संगमनेर तालुक्यामध्ये सध्याचे विद्यमान सत्ताधारी फक्त निधी आला इतका कोटी आला अशा बातम्या देतात प्रत्यक्षात कोणतेही काम सुरू नाही जे काम सुरू आहे ते लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात मंजूर झालेली कामे आहेत याशिवाय आमदार सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यातून मिळालेले निधीतून काम होत आहे नवीन लोकप्रतिनिधींचे एक काम दाखवा असे आवाहनही त्यांनी केले.


**जाहीर नोटीस**

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/०१/२०२६
कोपरगांव दि. ०७/०७/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
रशिद अजिज शेख रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर.
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी
तथा मुख्याधिकारी नगरपरिषद
कोपरगांव ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार रशिद अजिज शेख रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार नामे रशिद अजिज शेख यांचे पत्नी दिनांक. २२/०५/१९८९ रोजी मौजे. कोपरगांव ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार यांचे पाल्य नामे नाजनीन रशिद शेख यांचा जन्म झाला आहे. अर्जदार यांच पाल्याचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे पाल्याचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे पाल्याचा जन्म दिनांक. २२/०५/१९८९ रोजी मौजे. कोपरगांव ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे पाल्याचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि.०७/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

शिक्का

**हुकुमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**



**जाहीर नोटीस**

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/१७२/२०२६
कोपरगांव दि. २४/०८/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
जावेद नसिरभाई शेख, रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिलयानगर.
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी
तथा नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार जावेद नसिरभाई शेख रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार नामे जावेद नसिरभाई शेख यांची आई या दिनांक. २९/०७/१९७६ रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार यांची बहिन नामे सायराबी नसीर शेख हिचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे बहिनीचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे बहिनीचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी त्यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे बहिनीचा जन्म दिनांक २९/०७/१९७६ रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. २४/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

शिक्का

**हुकुमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

# त्रिमूर्ती संकुलातील जि. प. शैक्षणिक गुणवत्ता उद्बोधन कार्यशाळा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासाफाटा येथे शिक्षण महर्षी मेजर साहेबराव घाडगे पाटील यांनी स्थापित केलेल्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात आयोजित जिल्हा परिषद शैक्षणिक गुणवत्ता उदबोधन कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मिशन आरंभ या मोहिमेमुळे जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होत आहे.

सर्व शाळांमध्ये वाचन संस्कृती जोपासावी ती काळाची गरज असून या उदबोधन वर्गासाठी जिल्ह्यातून बुद्धिवंत शिक्षकांची मांदियाळी जमली असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी मोलाचे ठरणार असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी काढले. जिल्हा परिषद अहिल्यानगर शिक्षण विभाग प्राथमिक यांच्या वतीने आयोजित शैक्षणिक गुणवत्ता उदबोधन सत्रांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा सन २०२६ सोमवार दि. ०८ सप्टेंबर २०२६ रोजी श्री. दादासाहेब हरीभाऊ घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मुकिंदपूर ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील राजमाता हॉलमध्ये उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेचे आयोजन सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत करण्यात आले होते.त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या उपाध्यक्षा ॲड स्नेहलताई चव्हाण- घाडगे पाटील यांची विशेष उपस्थिती या कार्यशाळेच्या प्रसंगी लाभली. कार्यशाळेस प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील यांनी शैक्षणिक गुणवत्तेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत गुणवत्तावाढीसाठी करावयाच्या उपाययोजना नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी यावर सखोल चर्चा करण्यात आली.यावेळी नेवासा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल, नेवासा पंचायत समिती शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी शिवाजी कराड,श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील विद्यालयाचे प्राचार्य सोपानराव काळे,समन्वयक दत्तात्रय वांढेकर,ढूबे साहेब उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे



पाटील विद्यालयाचे प्राध्यापक अशोक गाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षण विभागाच्यावतीने करण्यात आले.यावेळी जिल्हयातील शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पान १ वरुन

## जरांगेंनी दोन पावले पुढे यावे; विखेंचे आवाहन

दावा विखे पाटील यांनी केला. आतापर्यंत ५२२ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २२४ अर्ज दाखल्यांशी संबंधित असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे सरकारने सुरू केलेल्या प्रक्रियेला मराठा समाजाचा प्रतिसाद किती आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. याचवेळी त्यांनी यापूर्वीच्या सरकारच्या भूमिकेवरही निशाणा साधला. २०१४ नंतर मराठा समाजासाठी अनेक निर्णय घेण्यात आले; मात्र उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात मराठा आरक्षण गमावले गेले, असा आरोप विखे पाटील यांनी केला. या संपूर्ण पार्श्वभूमीचा विचार जरांगे पाटील यांनी करावा, असेही त्यांनी नमूद केले.

एकीकडे सरकारने जरांगेंच्या १५ पैकी १२ मागण्या मान्य केल्याचा दावा केला आहे, तर दुसरीकडे जरांगे पाटील सर्व मागण्यांवर ठाम आहेत. १२ सप्टेंबर रोजी बैठक घेऊन पुढील दिशा ठरवण्याची आणि त्यानंतर मुंबईकडे कूच करण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे आंदोलनाचा पुढील टप्पा आता निर्णायक ठरण्याची शयता आहे.सरकारचे शिष्टमंडळ मुंबई किंवा अन्य ठिकाणी जाणार नसल्याचे विखे पाटील यांनी स्पष्ट केले. 'सरकारने आपली बाजू मांडण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. आता जरांगे पाटील यांनी दोन पावले पुढे यावीत,' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, मंत्री उदय सामंत यांनीही जरांगे पाटील यांनी संयमाने बोलावे, असे आवाहन केले. मराठा समाजाला न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काम केले असल्याने त्यांच्यावर टीका करणे योग्य नसल्याचे सामंत म्हणाले.

मंत्री प्रताप सरनाईक यांनीही जरांगेंच्या मुंबईकडे कूच करण्याच्या भूमिकेवर प्रतिक्रिया देताना लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येकाला असल्याचे मान्य केले; मात्र नेत्यांबद्दल बोलताना मर्यादा पाळल्या पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले. उपोषणाचा अकरावा दिवस, प्रकृती खालावत असतानाही जरांगेंचा निर्धार, सरकारचा 'निर्णय घेतल्याचा' दावा आणि १२ सप्टेंबरची मुंबईकडे कूच करण्याची घोषणा या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलन आता निर्णायक वळणावर आले आहे. सरकार झुकणार की जरांगे मुंबईकडे कूच करणार, याचा फैसला आगामी काही दिवसांत होण्याची शयता आहे.

## स्त्रीभ्रूणहत्येविरोधात राज्यस्तरीय कृती दलाची स्थापना

कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्याचे अधिकार कृती दलाला देण्यात आले आहेत. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासोबतच मुलींच्या जन्माचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या जनजागृती मोहिमा राबविण्यासाठीही कृती दल उपाययोजना सुचवणार आहे. जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि संबंधित समुचित प्राधिकाऱ्यांना कृती दलाला आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक आणि अभिलेखीय सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.कृती दल दर तीन महिन्यांनी आपल्या निरीक्षणांचा आणि शिफारशींचा अहवाल सार्वजनिक आरोग्य विभागाला सादर करणार असून या कृती दलाचा कार्यकाळ तीन वर्षांचा राहणार आहे.स्त्रीभ्रूणहत्या आणि बेकायदेशीर गर्भपात रोखण्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीवर थेट देखरेख, अचानक तपासण्या आणि उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई या निर्णयामुळे राज्यातील अनधिकृत सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांवर शासनाचा अंकुश अधिक कडक होण्याची शयता आहे.

## भरती परीक्षांचा घोळ संपवण्यासाठी टास्क फोर्स मैदानात !

उपाययोजनांबाबतही सूचना मागविण्यात येणार आहेत.याशिवाय भरती प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कोणत्या पद्धती प्रभावी ठरू शकतात, परीक्षा पद्धतीत तंत्रज्ञानाचा अधिक सुरक्षित वापर कसा करता येईल आणि उमेदवारांचा शासनाच्या भरती प्रक्रियेवरील विश्वास कसा वाढविता येईल, याबाबतही टास्क फोर्सकडून मते जाणून घेतली जातील.

विभागनिहाय दौऱ्यात प्राप्त होणाऱ्या सूचना, तक्रारी, अनुभव आणि अभिप्रायांचे संकलन करून त्यांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. त्याआधारे भरती परीक्षा अधिक सुरक्षित, निष्पक्ष आणि पारदर्शक करण्यासाठी आवश्यक शिफारशी शासनाला सादर करण्यात येणार आहेत. त्यामुळे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या हजारो उमेदवारांच्या अपेक्षा आणि अडचणी शासनापर्यंत थेट पोहोचण्यास मदत होणार आहे.

.........

## सातबारा नोंदीसाठी लाच; महिला मंडळ अधिकाऱ्याला अटक

केली. त्यापैकी एक हजार रुपये यापूर्वी त्यांना देण्यात आले होते. उरलेल्या चार हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली. या तक्रारीची पडताळणी करताना २७ जुलै रोजी मंडळ अधिकारी पुंड यांनी यापूर्वी एक हजार रुपये घेतल्याचे मान्य करून उर्वरित चार हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शविली. तसेच तहसील कार्यालयातील अन्य कर्मचाऱ्याला लाच देण्यास प्रवृत्त केल्याचेही पडताळणी चौकशीत समोर आले.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील कलम ७ व १२ नुसार कारवाई करण्यात आली.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पुढील कार्यवाही केली. प्रशासकीय कामांसाठी लाचेची मागणी करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिला आहे.

.........

## 'भावपूर्ण श्रद्धांजली' पोस्टने संगमनेरचे राजकारण तापले

संबंध नसल्याचा दावाही त्यांनी केला. हा प्रकार आमदार होण्यापूर्वीचा असल्याचे सांगत तो आता राजकीय हेतूने उकरून काढला जात असल्याचा आरोप खताळ यांनी केला.या संपूर्ण प्रकरणामागे कोणाचा हात आहे, याचा शोध घेणार असल्याचे खताळ यांनी म्हटल्याने राजकीय चर्चेला आणखी धार आली आहे. एखाद्या लोकप्रतिनिधीविरोधात धमकीवजा मजकूर आणि 'भावपूर्ण श्रद्धांजली'सारखी पोस्ट प्रसारित करण्यामागे केवळ वैयक्तिक वाद आहे की त्याला राजकीय किनार आहे? असा सवाल आता उपस्थित होत आहे.खताळ यांनी या प्रकाराचा संबंध राजकीय विरोधकांच्या नाराजीशी जोडला असून, पराभव जिव्हारी लागल्याने असे प्रकार सुरू झाल्याचा आरोप केला आहे. मात्र, या आरोपांमागील नेमकी पार्श्वभूमी आणि सोशल मीडिया पोस्ट करणाऱ व्यक्तीची भूमिका तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.संगमनेरच्या राजकारणात यापूर्वीही आरोप-प्रत्यारोपांना उधाण आलेले असताना आता सोशल मीडिया पोस्टच्या निमित्ताने नव्या वादाला तोंड फुटले आहे. लोकप्रतिनिधीची बदनामी, धमकीवजा भाषा आणि त्यामागील कथित राजकीय सूत्रधार या तीन मुद्द्यांभोवती आगामी काळात राजकीय चर्चा रंगण्याची शयता आहे.आमदार खताळ यांनी कायदेशीर कारवाईचा इशारा दिल्याने आता पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी होते का, सोशल मीडिया पोस्टमागील नेमकी पार्श्वभूमी काय आहे आणि खताळ यांनी केलेल्या 'राजकीय हात' असल्याच्या आरोपाला काही आधार मिळतो का, याकडे संगमनेरचे लक्ष लागले आहे.दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या पोस्टची स्वतंत्रपणे सत्यता आणि संबंधित व्यक्तीची नेमकी भूमिका अधिकृत तपासातून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

### 'डॉल्बी वाजवणारे हिंदूविरोधी!'

दुसरीकडे डीजे समर्थकांकडून सरसकट बंदीऐवजी नियमांनुसार आवाजाची मर्यादा निश्चित करून उत्सव साजरे करण्याची भूमिका मांडली जात आहे. त्यामुळे धार्मिक परंपरा, उत्सवाचा जल्लोष आणि ध्वनीप्रदूषण यांचा वाद आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर आणखी पेटण्याची शयता आहे.दहीहंडीचा उत्सव नेमका संस्कृती जपण्यासाठी की डीजे-डॉल्बीच्या दणदणाटासाठी? हा सवाल आता महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

# शिर्डी सोसायटीच्या पदाधिऱ्यांची मनमानी

## हक्काचे गाळे सभासदांना द्या : नानासाहेब शिंदे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : विविध कार्यकारी सोसायटी च्या मालकीचे अनेक व्यावसायिक गाळे आहेत, ते बाहेरील लोकांना न देता संस्थेच्या सभासदांना किंवा त्यांच्या मुलांना व्यवसाय करण्यासाठी प्राधान्याने द्यावेत, जेणेकरून स्थानिक सभासदांच्या मुलांना रोजगाराची संधी मिळेल आणि संस्थेचा पैसा संस्थेतच राहील, अशी मागणी सोसायटीचे सभासद तथा भाजपचे प्रांतिक सदस्य नानासाहेब शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, संस्थेमार्फत सभासदांना आणि विशेषतः स्थानिक शेतकरी सभासदांना शेतीसाठी लागणारे 'युरिया' खत वेळेवर आणि योग्य दरात उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही. यासोबतच, संध्याकाळच्या वेळी संस्थेच्या परिसरामध्ये ज्या नाश्त्याच्या गाड्या लागतात, त्यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची आणि त्यांची संख्या याची स्वतंत्र नोंद ठेवून ती वार्षिक अहवालामध्ये प्रसिद्ध करावी, जेणेकरून संस्थेच्या कारभारात पारदर्शकता राहील.

याशिवाय, दिवाळी सणाचे औचित्य साधून दरवर्षी सर्व सभासदांना संस्थेकडून मिठाई आणि चिवड्याचे वाटप करून भेट द्यावी. यामुळे सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण तयार होईल



आणि संस्थेबद्दल आपुलकी वाढेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले असून, या सर्व मागण्यांवर आगामी सभेत सकारात्मक विचार करावा अन्यथा वार्षीक सर्वसाधारण सभेत जाब विचारला जाईल असा इशारा शिंद यांनी दिला आहे.

# कोपरगाव शहर राष्ट्रवादीची कार्यकारिणी लवकरच जाहीर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी विविध विभाग व सेलच्या कार्यकारिण्या गठित करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच या कार्यकारिण्यांची अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे.

यामध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेस, विद्यार्थी काँग्रेस, महिला काँग्रेस, युवती काँग्रेस, ओबीसी, अल्पसंख्याक, सामाजिक न्याय, सोशल मीडिया, ज्येष्ठ नागरिक, डॉक्टर, वकील, सेवा दल तसेच सांस्कृतिक व क्रीडा विभागांचा समावेश राहणार आहे.

शहरातील युवक-युवती, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या नागरिकांना पक्ष संघटनेत सक्रिय भूमिका देण्यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः युवकांना संघटनेत मोठी संधी देतानाच महिलांचा सहभाग वाढविणे, सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रभावी जनसंवाद साधणे आणि डॉक्टर, वकील, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींना पक्षाशी जोडण्याचे नियोजन आहे.

# निधन

## प्रल्हाद ढोके



**राहुरी** : अहिल्यानगर येथील प्रल्हाद ढोके वय ८५ वर्षे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. महात्मा गांधी ज्युनिअर कॉलेजमध्ये बायलॉजी या विषयाचे रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड सातारा चे व्हाईस चेअरमन तसेच अहमदनगर जिल्हा जुनिअर कॉलेज शिक्षक संघटनेचे सचिव होते.त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा सून नातवंडे असा परिवार असून राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील बांधकाम विभागातील मुख्य अभियंता मिलिंद ढोके यांचे ते वडील होत.

## भाऊसाहेब काळे



**वडाळा महादेव** : राहाता तालुक्यातील ममदापूर येथील भाऊसाहेब शंकर काळे (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, पुतणे, पुतण्या, नातू , सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील लॉन्ड्री व्यावसायिक बंडू काळे यांचे ते वडील तर बाळासाहेब काळे ' लक्ष्मण काळे मंदाबाई शिंदे सुनंदा बोरुडे रंजना बोरुडे यांचे ते चुलते तर सामाजिक कार्यकर्ते वैभव काळे यांचे ते आजोबा होत.

## अशोक गंगवाल



**श्रीरामपूर** : दिगंबर समाजातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक रतनलालजी गंगवाल (वय ७२) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी,एक भाऊ, दोन मुलगा, दोन मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. दिगंबर जैन समाज श्रीरामपूरचे विश्वस्त व स्वस्तिक इंटरप्राईजेसचे मालक विक्रांत व चेतन गंगवाल यांचे वडील, व विलास यांचे बंधु तर व सुकुमार याचे चुलते होते.

# नांदूर मध्यमेश्वरचे ओव्हरफ्लो पाणी शिवना नदीच्या पात्रात सोडण्यासाठी उपोषण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : नांदूर मध्यमेश्वर धरणाचे ओव्हरफ्लोचे पाणी पोटचारी कॅनॉलद्वारे गंगापूर तालुक्यातील शिवना नदीच्या पात्रात सोडण्यात यावे तसेच हेड ते टेल पर्यंत सर्व शेतकऱ्यांना मिळावे या मागणीसाठी शेतकऱ्यांनी ७ सप्टेंबर पासून शिवना नदी जवळच मांलुजा येथे बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

गंगापूर येथील जलसंपदा विभागास दिलेल्या





निवेदनात म्हटले आहे की नांदूर मध्यमेश्वर धरणातून दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर ओव्हरफ्लोचे पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येते आणि वाहून जाते. हेच पाणी एक्सप्रेस कॅनॉल किंवा पोटचाऱ्याद्वारे गंगापूर तालुक्यातील मालुंजा जवळ शिवना नदीच्या पात्रात वळवले,तर शिवना नदीकाठच्या ३० ते ४० गावांचा पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो मालुंजा या भागातील शिवना नदीकाठचे शेतकरी दरवर्षी तीव्र पाणीटंचाईला सामोरे जात आहेत. ओव्हरफ्लोचे वाया जाणारे पाणी योग्य नियोजनाद्वारे शिवना नदीत सोडल्यास परिसरातील भूजल पातळी वाढून शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळेल. रोटेशनचे पाणी टेल पर्यंतच्या शेतकऱ्यांना मिळत नसुन वारंवार रोटेशन नसताना चारीचा गेट खुला करणाऱ्या शेतकऱ्यांविरोधात कडक कार्यवाही करावी. यासह आदी मागण्यांसाठी सोपान कवडे, योगेश पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

# वैजापुरात मराठा आरक्षणासाठी दीड तास रास्ता रोको

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी वैजापूर शहरात मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात करण्यात आल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात ८ सप्टेंबर रोजी दुपारी ११ वाजता सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको करण्यात आला. या आंदोलनामुळे मुख्य रस्त्यावर वाहतुकीची काही काळ मोठी कोंडी झाली होती.



यावेळी मराठा समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन वैजापूरचे तहसीलदार सुनील सावंत यांना देण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आणि त्यांच्या मागण्यांना समर्थन दर्शवत शासनाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ११ दिवसांपासून उपोषण सुरू आहे. मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, तसेच प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत होणारा विलंब दूर करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनाला प्रशांत सदाफळ, प्रकाश ठुबे, बाळा पाटील जाधव, सुनील बोडखे, नितीन निकम, आनंद मगर, अजय साळुंके, कृष्णा जाधव, प्रशांत निकम, गणेश नाईकवाडी, भाऊसाहेब गलांडे, मिथुन बहिरट, केतन आव्हाले, जितेंद्र चव्हाण, अनिल वाणी, दिलीप कुदे,वेणूनाथ इंगळे, संतोष गायकवाड, मनोज जाधव, अनिल जाधव, मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी विनय सोनावणे, फौजदार यशवंत पाडाळे, रामचंद्र जाधव, अविनाश भास्कर, ज्ञानेश्वर मेटे तसेच कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# शिल्लेगाव सर्कलमध्ये पावसाअभावी खरीप पिके धोक्यात

# सरसकट पंचनामे करून तातडीने मदत द्या; संतोष जाधव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील शिल्लेगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये पावसाअभावी खरीप पिके उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे बाधित पिकांचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, तसेच पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना विम्याची नुकसानभरपाई मंजूर करावी, अशी मागणी माजी अर्थ व बांधकाम सभापती संतोष जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. खरीप हंगामाच्या सुरुवातीला परिसरात अत्यल्प व अनियमित पाऊस झाला. त्यानंतर मागील अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतातील पिके कोमेजून वाळू लागली आहेत. उत्पादनाची अपेक्षा असलेली पिके डोळ्यांदेखत नष्ट होत असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

पिके वाचविण्यासाठी आवश्यक पाणी उपलब्ध नसून, उपलब्ध पाण्यावर सिंचन करण्यासाठीही मोठा खर्च येत आहे. शेतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता असून, कर्जफेडीची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. पिकांचे नुकसान झाल्यास त्याचा परिणाम शेतकऱ्यांसह ग्रामीण बाजारपेठा, मजूर, दुकानदार व वाहतूकदारांवरही होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



शेतकरी केवळ मदतीची नव्हे, तर संकटाच्या काळात शासनाने आपल्या पाठीशी उभे राहण्याची अपेक्षा करत आहे, असे संतोष जाधव यांनी म्हटले आहे.

शिल्लेगाव सर्कलमधील पावसाअभावी बाधित सर्व खरीप पिकांचे तातडीने सरसकट पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी. तसेच पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची नोंद घेऊन नियमानुसार विमा भरपाई मंजूर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनाची प्रत आमदार प्रशांत बंब यांनाही देण्यात आली.

# गरजूंच्या ताटात मायेची पुरणपोळी..!

## 'साई छत्र' बनले अन्नदान छत्रछायेचे केंद्र

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : 'अन्नदान हेच श्रेष्ठ दान' ही भारतीय संस्कृतीने दिलेली शिकवण केवळ शब्दांत न ठेवता आपल्या कृतीतून जगणारे अनेक हात समाजात आहेत. त्यापैकीच एक संवेदनशील आणि कृतज्ञ मन म्हणजे लोणी येथील साई छत्र हॉटेल व उद्योग समूहाचे गणपतशेठ विश्वनाथ भोसले व त्यांचे चिरंजीव शैनेश भोसले. स्वतःच्या आयुष्यातील संघर्ष आणि प्रतिकूल दिवस विसरून न जाता, आज गरजूंच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्याचे काम भोसले कुटुंबीय सातत्याने करीत असून हजारोंना फळे व खिचडी वाटप आणि ५१ हजारांची देणगी देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे. आज व्यवसायाने गरुडझेप घेतली असली, तरी पाय मात्र मातीतच आहेत, याची प्रचिती त्यांच्या सामाजिक उपक्रमांतून येते. वर्षभर गोरगरीब, गरजू, वारकरी तसेच विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना मुक्तहस्ते अन्नदान व आर्थिक मदत करण्याची परंपरा भोसले कुटुंबीयांनी जपली आहे.

**ग्राहकांच्या प्रेमाचे ऋण अन्नदानातून..**

यशाच्या शिखरावर पोहोचूनही संघर्षाच्या दिवसांची जाणीव गणपतशेठ भोसले यांचा प्रवास हा केवळ व्यवसायवृद्धीचा नाही, तर 'शून्यातून विश्व उभे करण्याचा आणि त्या विश्वातील आनंद समाजासोबत वाटण्याचा' प्रवास आहे. सुरुवातीच्या संघर्षाची जाणीव आजही मनात जिवंत असल्याने गरिबी, भूक आणि गरज यांची वेदना त्यांना अधिक जवळून समजते. म्हणूनच स्वतःच्या यशाचा काही भाग समाजासाठी खर्च करण्याची त्यांची भूमिका आहे. ग्राहकांनी दिलेल्या प्रेमाचे ऋण अन्नदानाच्या रूपाने फेडण्याचा भोसले कुटुंबीयांचा प्रयत्न प्रवरा परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

श्रावण मासात शिव भक्तांसाठी भक्तांसाठी खिचडी आणि फळवाटप करीत श्रीक्षेत्र निझर्नेश्वर येथील महादेव मंदिराच्या कामासाठी ५१ हजार रुपयांची देणगी दिली.

लोणी येथील वरदविनायक सेवाधामच्या पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी पुरणपोळीचे भोजन देण्यात आले. अन्नदानासोबतच सामाजिक संस्थांच्या कार्याला हातभार लावत भोसले परिवाराने सामाजिक बांधिलकीची आणखी एक वीण घट्ट केली.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि. ०९ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | १५६<br>२४६<br>६६० | ९ | २७०<br>४५०<br>१४४ | ३ | १२०<br>६७०<br>३८० |

६२-२४-१९-९०-७३-३८

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २३०<br>२५०<br>१२२ | ७ | १२४<br>१७९<br>७०० | ४ | १३०<br>१४९<br>४४६ |

८५-५१-२७-७९-६४-४०

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २३८<br>४९०<br>६७० | ४ | १३०<br>३३८<br>४०० | ० | १९०<br>२८०<br>२४४ |

७३-३१-९४-४५- ६०-८०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

# डीएसपी चौकातील उड्डाणपुलाचा मार्ग मोकळा!

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** अहिल्यानगर शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या डीएसपी चौकातील कोंडीचा प्रश्न आता कायमस्वरूपी मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. शहराच्या वाढत्या वाहतुकीचा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून डीएसपी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या कामाला गती मिळाली असून या प्रकल्पासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने तसेच आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण प्रकल्प पुढे आला आहे.

कोपरगाव-शिर्डी-कोल्हार-अहिल्यानगर या प्रमुख मार्गावरील डीएसपी चौक हा शहरातील वाहतुकीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. संभाजीनगरकडून येणारी वाहने तसेच शिर्डी, कोपरगाव, कोल्हार आणि शहराच्या विविध भागांकडे जाणारी वाहतूक या चौकातून मोठ्या प्रमाणावर होते. वाढत्या वाहनसंख्येमुळे विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत या ठिकाणी मोठी कोंडी होत होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने नागरिकांना बराच वेळ वाहतुकीत अडकून राहावे लागत होते. परिणामी वेळ आणि इंधनाचा अपव्यय होण्याबरोबरच रोजच्या प्रवासाचा ताणही वाढत होता.

शहराच्या दैनंदिन वाहतुकीशी निगडित हा प्रश्न लक्षात घेऊन डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता भविष्यातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारण्याची गरज त्यांनी मांडली. त्यांच्या पाठपुराव्याला पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.



डीएसपी चौकातील प्रस्तावित उड्डाणपुलासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या प्रकल्पाला आता प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली आहे.

उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर डीएसपी चौकातील मुख्य वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. शिर्डी, कोपरगाव, कोल्हार तसेच अहिल्यानगर शहराच्या विविध भागांकडे जाणाऱ्या वाहनांना अधिक सुरळीत मार्ग उपलब्ध होईल. परिणामी चौकातील कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे.

डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीचा परिणाम कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्णवाहिका तसेच शहराबाहेर प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा दररोज सामना करावा लागत होता.

वर्षानुवर्षे डीएसपी चौकातील कोंडीचा त्रास सहन करणाऱ्या नागरिकांसाठी उड्डाणपुलाच्या मंजुरीमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती मिळाली आहे.

शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच महायुती सरकारचे मनः पूर्वक आभार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले. शहराच्या वाढत्या गरजा आणि भविष्यातील वाहतुकीचा विचार करून शासनाने घेतलेला हा निर्णय अहिल्यानगरच्या विकासाला अधिक गती देणारा ठरेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## द • ख • ल

### हरिहरेश्वर महादेव मंदिरात 'कैलास मानसरोवर'ची आकर्षक सजावट

**अहिल्यानगर :** बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिरात हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या वतीने नित्य सोमवार महाआरतीचा ५४ वा सोहळा तसेच चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त 'कैलास मानसरोवर'ची आकर्षक व मनमोहक विशेष सजावट करण्यात आली. या विशेष सजावटीचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांना महाप्रसादाचा लाभ मिळावा, यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष नियोजन केले होते.



संपूर्ण कार्यक्रमादरम्यान मंदिर परिसरात शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या कार्यकर्त्यांनी चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त 'कैलास मानसरोवर' ही संकल्पना साकारण्यासाठी विशेष मेहनत घेतली. सजावट, महाआरती तसेच भाविकांच्या सुविधांसाठी कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे हा धार्मिक सोहळा उत्साहात व यशस्वीपणे पार पडला. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार धार्मिक वातावरणात साजरा करण्याची परंपरा जपत मंडळाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपक्रमांचे भाविकांकडून कौतुक होत आहे.

### शुक्रवारी अहिल्यानगरात मुख्याध्यापकांचे चर्चासत्र

**अहिल्यानगर :** शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अमरज्योत मंगल कार्यालय, नगर-कल्याण रोड बायपास जवळ, अहिल्यानगर येथे मुख्याध्यापक संघाचे एक दिवसीय शैक्षणिक चर्चासत्र आयोजित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी दिली. शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, नवोपक्रमशील शिक्षकांचे कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, तसेच शिक्षण क्षेत्रातील बदलत्या प्रवाहावर विचारमंथन करण्याच्या उद्देशाने 'ज्ञान कलश' विशेषांकाचे या चर्चासत्रामध्ये प्रकाशन करण्यात येणार असून, या चर्चासत्रासाठी आ. संग्राम जगताप, आ. डॉ. सत्यजित तांबे, उपमहापौर धनंजय जाधव, सिचन्द्र प्रताप सिंह, मा. डॉ. महेश पालकर, रमाकांत काटमोरे, औदुंबर उकिर्डे, डॉ. गणपतराव मोरे, संध्या गायकवाड, बी. जे. पाटील, बाळासाहेब बुगे, दिलीपराव थोरे, पांडुरंग मगर आदी अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

### सावेडीच्या श्री समर्थ विद्यामंदिरात शिक्षक दिन उत्साहात साजरा



**अहिल्यानगर :** श्री समर्थ विद्यामंदिर, सावेडी विभाग येथे श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभाग सावेडी आणि श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक, माध्यमिक विभाग सांगळे गल्ली या सर्व विभाग मिळून भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळे, चेअरमन वि. ल. सोनटक्के, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सेक्रेटरी प्र. स. ओहोळ, सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर, खजिनदार संजय कुलकर्णी, सदस्य ड. किशोर देशपांडे, स्वानिल कुलकर्णी, संध्या कुलकर्णी, सुनील जोशी, सचिन क्षीरसागर, श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वसुधा जोशी, माध्यमिक विभाग सांगळे गल्ली येथील मुख्याध्यापक सुनील कानडे, श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, श्री समर्थ विद्यामंदिर सावेडी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन, सावेडी विभागाच्या पर्यवेक्षिका शारदा होशिंग आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष शोभा आली.

## संत सेना महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचा रौप्य महोत्सव उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त राशीन शहरात गेल्या २५ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा यंदा रोप्य महोत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या २५ वर्षांच्या अखंड भक्तीपरंपरेने राशीनच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात मानाचा तुरा रोवला आहे. राशीन शहर व परिसरातील नाभिक समाजाच्या सर्व बांधवांनी या धार्मिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. तसेच कर्जत तालुक्यातील विविध क्षेत्रांतील नामांकित मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

राशीन शहर नाभिक संघटनेच्या वतीने सप्ताहाचे संपूर्ण आयोजन व नियोजन करण्यात आले. सप्ताहाच्या सातही दिवस महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार महाराजांची हरिकीर्तने पार पडली. भक्तिरस, अध्यात्म आणि संतविचारांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता. सप्ताहाच्या आठव्या दिवशी काल्याचे कीर्तन व ग्रामफेरी आयोजित करण्यात आली.

## राजे उमाजी नाईक यांच्या शौर्याची विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी : घोलप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील पद्मभूषण उपाधीने सन्मानित प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी नितीन घोलप यांनी मनोगत व्यक्त करताना राजे उमाजी नाईक यांच्या शौर्य, धैर्य आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. राजे उमाजी नाईक यांच्या संघर्षातून विद्यार्थ्यांनी देशभक्ती, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रा. अर्जुन चाटे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. संजय जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. सुनीता जाधव, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, प्रा. संदीप गेटम, प्रा. अमोल नालकर, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. ऋषिकेश गीते, प्रा. राजाराम गोरडे, प्रा. सुनीता भालेराव, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, नितीन घोलप, छाया म्हस्के, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कानिंगध्वज, मच्छिंद्र म्हस्कुले यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय महामार्गाची हद्द निश्चित करून अतिक्रमणे हटवा : पवार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड तालुका :** जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. NH-548D वरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटवून महामार्गाची अधिकृत आणि मध्यरेषा निश्चित करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी केली आहे. याबाबत त्यांनी अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, त्याची प्रत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसेच राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांच्या कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या सुरक्षिततेबाबत सर्वोच्च न्यायालयाने १३ एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणात निर्देश दिले आहेत. त्यानुसार महामार्गाच्या ठजथ मध्ये नवीन ढाबे, खानावळी व व्यावसायिक बांधकामांना प्रतिबंध तसेच अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्देशांची छक-५४८ऊ वर प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी पवार यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १० ऑगस्ट २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासह जमीन वापर बदल आणि ठजथ मधील अतिक्रमणांबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या परिपत्रकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. महामार्गाची मध्यरेषा व ठजथ निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभाग, भूमी अभिलेख, महसूल विभाग आणि जामखेड नगरपरिषद यांच्या संयुक्त उपस्थितीत मोजणी करावी. समर्थ हॉस्पिटल ते बीड कॉर्नर, बीड कॉर्नर ते खर्डा चौक तसेच नगरपरिषद हद्दीतील सर्व बाधित भागांची पाहणी करून अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांची यादी तयार करावी.

## विषमुक्त शेतीसह आरोग्यासाठी रानभाज्यांचा आहारात वापर वाढवावा

### रानभाजी महोत्सव घेण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे बऱ्हाटे यांची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. कमी जोखमीची, पर्यावरणपूरक आणि विषमुक्त शेती करून जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण एक टक्क्यापेक्षा अधिक वाढविण्यासाठी नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर पारंपरिक पद्धतीने उपलब्ध होणाऱ्या रानभाज्यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्या संवर्धनासाठी शासनस्तरावर व्यापक प्रयत्न होणे आवश्यक आहे असे मत सेवानिवृत्त .जिल्हाअधीक्षक कृषीअधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी व्यक्त केले.




कर्टुले ही पारंपरिक रानभाजी असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अन्नघटक उपलब्ध असतात. ही रानभाजी प्रामुख्याने खरीप हंगामात उपलब्ध होते. बांधावर नैसर्गिकरीत्या येणाऱ्या रानभाज्यांमध्ये कोणत्याही प्रकारची रासायनिक खते किंवा रासायनिक फवारणी नसल्याने त्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. हंगामानुसार उपलब्ध होणाऱ्या या भाज्यांमधून शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे व पोषक घटक मिळतात. आरोग्यसंपन्न जीवनासाठी पारंपरिक रानभाज्यांचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. धान्य महोत्सवाच्या धर्तीवर शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात रानभाजी महोत्सव आयोजित करून रानभाज्यांचे महत्त्व पौष्टिकता आणि नैसर्गिक शेतीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवावा अशी मागणी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे केली.

## आईसस्टॉक अजिंक्यपद स्पर्धेत अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठान संघाचे राज्यस्तरीय यश

### १० सुवर्ण, १९ रौप्य व १० कांस्य पदकांसह उपविजेतेपदावर मोहोर



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** खुलताबाद (छ.संभाजीनगर) येथे महाराष्ट्र आईस स्टॉक स्पोर्ट असोसिएशनच्या वतीने दि. ४ ते ६ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ६ व्या राज्यस्तरीय आईसस्टॉक अजिंक्यपद स्पर्धेत अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठान अहिल्यानगर जिल्हा संघाने शानदार कामगिरी करत १० सुवर्ण, १९रौप्य आणि १० कांस्य पदकांची कमाई करून उपविजेतेपद पटकावले. अचूक लक्ष्यवेध, उत्कृष्ट कौशल्य आणि सांघिक कामगिरीच्या जोरावर अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठान अहिल्यानगरच्या खेळाडूंनी स्पर्धेत आपली छाप पाडली.

या राज्यस्तरीय स्पर्धेला महाराष्ट्रभरातून विविध जिल्ह्यांमधील खेळाडूंसह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंनीही स्पर्धेत सहभाग घेतल्याने सर्वच सामने चुरशीचे झाले.आईसस्टॉक हा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक महासंघाद्वारे मान्यताप्राप्त खेळ असून हिवाळी ऑलिम्पिकमध्ये या खेळाचा समावेश आहे. तसेच खेलो इंडिया युथ गेम्स, खेलो इंडिया विंटर गेम्स, युनिव्हर्सिटी गेम्स आणि ऑल इंडिया पोलीस गेम्स यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्येही आईसस्टॉक खेळला जातो.

अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठान अहिल्यानगर जिल्हा संघाने स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि दमदार प्रदर्शन करत विविध गटांत पदकांची लयलूट केली. राज्यस्तरावर उपविजेतेपदामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला.

## शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर आ. दराडेंचा 'शिक्षक दरबार'

### अधिकाऱ्यांना दिरंगाई न करण्याची तंबी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) जिल्हा परिषदेत शिक्षक दरबार घेतला. जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात झालेल्या या बैठकीस शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माध्यमिक शिक्षण विभागातील विविध प्रश्नांबाबत शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या अडचणी मांडत प्रशासनाच्या दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त केली.

शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करताना आमदार किशोर दराडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रश्न तातडीने निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. 'शिक्षकांचे प्रश्न मार्गी लागले पाहिजेत. त्यांना विनाकारण त्रास होता कामा नये,' अशी स्पष्ट भूमिका घेत त्यांनी प्रशासनाला दिरंगाई न करण्याची तंबी दिली. तर पंधरा दिवसात प्रश्न न सुटल्यास पुढील बैठक शिक्षण आयुक्त कार्यालयात घेण्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांना दराडे यांनी दिला.

या शिक्षक दरबारात माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंधित अनेक महत्त्वाचे प्रश्न चर्चेत आले. शिक्षक नेते वैभव सांगळे यांनी माध्यमिक विभागात मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेल्या फायली, पोस्ट क्रिएट, निवडश्रेणी मान्यता तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीसंदर्भातील प्रश्न आमदार दराडे यांच्या निदर्शनास आणून दिले. या प्रश्नांबाबत आमदार दराडे यांनी शिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा करून संबंधित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत सूचना केल्या.




या बैठकीस शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेतन अधीक्षक रामदास म्हस्के, लेखा अधिकारी सतीश लहाने यांच्यासह संबंधित अधिकारी तसेच संभाजी पाटील, सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, भाऊसाहेब कचरे, दिलीप काटे, शिक्षक नेते वैभव सांगळे, अशोक आव्हाड, सुनील भोर, सचिन झगडे, अमोल ठाणगे, रवींद्र देवडे, राजेंद्र डमाळे, रवींद्र गावडे, तौसीफ शेख, सुधाकर सुंबे, संभाजी थोरात आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शालार्थ आयडीमध्ये असलेल्या विविध त्रुटी आणि दुरुस्त्यांचा प्रश्नही बैठकीत ऐरणीवर आला. काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीशी संबंधित त्रुटी अद्याप दूर न झाल्यामुळे त्यांच्या वेतनावर परिणाम होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. आप्पासाहेब शिंदे यांनी शालार्थ आयडीच्या राहिलेल्या त्रुटींमुळे काही शिक्षकांचे वेतन बंद झाल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाची दखल घेत आमदार दराडे यांनी शिक्षण संचालक पालकर यांच्याशी थेट संपर्क साधून शालार्थ आयडीसंदर्भातील प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत चर्चा केली. त्यामुळे संबंधित शिक्षकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षक नेते व शिक्षकांनी देखील विविध प्रश्न उपस्थित केले. माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित असलेल्या मुख्याध्यापक, प्राचार्य, पर्यवेक्षक व शिक्षक मान्यतेच्या प्रस्तावांबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. निवडश्रेणीच्या प्रलंबित मान्यतेसाठी आतापर्यंत किती प्रस्ताव प्राप्त झाले, त्यापैकी किती प्रस्तावांना मान्यता देण्यात आली, याची माहिती घेण्याची मागणी करण्यात आली. अशी मागणी केली. आमदार दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे यांनी या बैठकीचे नियोजन केले होते.

# भरती परीक्षा सुधारणांसाठी १२ सप्टेंबरला पुण्यात सल्लामसलत

## पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवारांना थेट सहभागाची संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. या समितीच्या माध्यमातून भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करण्यात येत असून, पुणे विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा यंत्रणा आणि विषयतज्ज्ञांशी थेट संवाद साधण्यासाठी १२ सप्टेंबर रोजी पुण्यात सल्लामसलत आयोजित करण्यात आली आहे.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणार संवाद :**

पुणे हे राज्यातील स्पर्धा परीक्षा तयारीचे महत्त्वाचे केंद्र असल्याने, भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणा सुचविण्यासाठी पुणे जिल्ह्यातील उमेदवारांचा प्रत्यक्ष सहभाग या सल्लामसलतीत महत्त्वाचा ठरणार आहे. हा संवाद कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. पुणे जिल्ह्यासह पुणे महसूल विभागातील संबंधित घटकांना या प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

**१० सप्टेंबरपर्यंत ई-मेलद्वारे सूचना पाठविण्याचे आवाहन :**
**इच्छुकांनी आपल्या सूचना व अभिप्राय गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ पर्यंत Pune-ExamReformsTaskforcemaharashtra.gov.in या ई-मेलवर पाठवावेत. प्राप्त सूचना आणि प्रत्यक्ष संवादासाठी आलेल्या विनंत्यांचा आढावा घेऊन शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी संबंधित व्यक्ती व संस्थांना चर्चेची वेळ कळविण्यात येणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.**

**परीक्षा प्रक्रियेतील अडचणी, अनुभव आणि सूचनांवर चर्चा :**

भरती परीक्षा प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी व उमेदवारांचे अनुभव, अडचणी, अपेक्षा आणि सुधारणा सूचना समिती जाणून घेणार आहे. प्रश्नपत्रिका व परीक्षा केंद्र व्यवस्थापन, परीक्षेची सुरक्षितता व विश्वासार्हता, तंत्रज्ञानाचा वापर, उमेदवारांशी संवाद, तक्रार निवारण आणि परीक्षा अनुभव यांसह भरती परीक्षा पद्धतीशी संबंधित विविध विषयांवर सूचना मांडता येणार आहेत.

**जिल्हाधिकारी कार्यालयात समन्वय कक्ष :**

या सल्लामसलत प्रक्रियेच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे ५ व्या मजल्यावर स्वतंत्र समन्वय कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक संस्था, विषयतज्ज्ञ आणि अन्य संबंधित घटकांना आपल्या सूचना व अभिप्राय थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

## दखल

### ई-पॉस मशीन बंद आंदोलनाला शिरूरमध्ये प्रतिसाद

**कवठे येमाई :** राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने सोमवारी (७ सप्टेंबर) पुकारण्यात आलेल्या एकदिवसीय ई-पॉस मशीन बंद आंदोलनाला शिरूर तालुक्यातील रास्त भाव दुकानदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तालुक्यातील दुकानदारांनी ई-पॉस मशीन बंद ठेवून आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला, अशी माहिती शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश रत्नपारखी यांनी दिली.सततच्या नेटवर्क समस्या, सर्व्हर डाउन होणे, कनेक्टिव्हिटीचा अभाव तसेच ई-पॉस मशीनमधील तांत्रिक अडचणींमुळे धान्य वितरणात अडथळे निर्माण होत आहेत. याचा त्रास रास्त भाव दुकानदारांसह लाभार्थ्यांनाही सहन करावा लागत असल्याने आंदोलन करण्यात आल्याचे संघटनेने सांगितले.



आंदोलनादरम्यान ई-पॉस मशीन सुरू अथवा लाईव्ह न करता धान्य वितरण बंद ठेवण्याचे आवाहन राज्य संघटनेने केले होते. त्यानुसार शिरूर तालुक्यातील दुकानदारांनी आंदोलनाला पाठिंबा दिला.यावेळी तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश रत्नपारखी, खजिनदार नवनाथ खैरे, सचिव संतोष सरोदे, सहसचिव सचिन नरवडे, राज्य संघटनेचे सहसचिव इंद्रभान ओव्हाळ, राज्य कार्याध्यक्ष प्रभाकर पाडळे व शरद कालेवर यांनी आंदोलन यशस्वी झाल्याचे सांगितले.

### हेमलता बढेकर यांची राज्य महिला आघाडी प्रमुखपदी नियुक्ती




कवठे येमाई : अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या राज्य महिला आघाडीच्या प्रमुखपदी हेमलता बाळासाहेब बढेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महासंघाच्या वतीने ६ सप्टेंबर रोजी त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार व महिला बचत गटांच्या विविध प्रश्नांसाठी तसेच महिला परवानाधारकांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी बढेकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. शासनस्तरावर प्रश्नांचा पाठपुरावा करून महिला परवानाधारकांचे सक्षमीकरण करण्यासाठी त्या प्रयत्नशील राहणार आहेत.या नियुक्तीबद्दल महासंघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी बढेकर यांचे अभिनंदन केले. नियुक्तीपत्रावर अध्यक्ष डी. एन. पाटील, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत यादव आणि ज्येष्ठ उपाध्यक्ष राजेश आंबेकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पुणे जिल्हाध्यक्ष सोमनाथ वचकल व शिरूर तालुका अध्यक्ष गणेश रत्नपारखी यांनीही बढेकर यांना शुभेच्छा दिल्या.

### करंजे येथे सोमेश्वर पालखी सोहळा थाटात; लाखो भाविकांची गर्दी



**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील करंजे (सोमयाचे करंजे) येथील प्रसिद्ध सोमेश्वर देवस्थानात श्रावणातील शेवटच्या सोमवारी लाखो शिवभक्तांनी स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेतले. यात्रेनिमित्त परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण होते.

मध्यरात्री राष्ट्रवादी काँग्रेसचे जय पवार यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. यावेळी बारामती उपविभागीय अधिकारी चैतन्य कदम, पीडीसी बँक संचालक संभाजी होळकर, देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंत मोकाशी, सचिव सचिन भांडवलकर यांच्यासह विश्वस्त, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

भाविकांसाठी महाप्रसाद, शुद्ध पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही व दर्शन रांगेची व्यवस्था करण्यात आली होती. वडगाव निंबाळकर सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते, करंजेपुल पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे व पोलीस उपनिरीक्षक दीपक वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी बंदोबस्त ठेवला. बारामती आगाराने विशेष बससेवा, तर प्राथमिक आरोग्य केंद्र होळ यांनी आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिली.

सकाळी विश्वस्त मंडळाच्या हस्ते पालखीची महापूजा झाल्यानंतर सोमेश्वर महाराजांची पालखी पालखीतळाकडे मार्गस्थ झाली. मंदिर प्रदक्षिणा करून मुख्य पेठेतून निघालेल्या पालखी सोहळ्यात 'सोमेश्वर महाराज की जय', 'हर हर महादेव'च्या जयघोषात गुलालाची उधळण करण्यात आली.

## यवत-खुटबाव रस्ता अर्धवट; धुळीने नागरिक त्रस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**यवत :** एमएसआयडीसी बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली सुरू असलेला यवत-खुटबाव रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत राहिल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यवत येथील दलित वस्तीपर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले असून, वस्तीतच काम अपूर्ण सोडण्यात आल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे.

या रस्त्यावरून दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्याने धुळीचे लोट नागरिकांच्या घरांमध्ये जात आहेत. विशेषतः लहान मुले आणि वृद्धांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. रस्त्याचे काम पूर्ण करायचे नव्हते, तर चांगला असलेला डांबरी रस्ता खोदून का ठेवण्यात आला, असा सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे.



अर्धवट कामामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून, वाहनचालकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, या प्रश्नाकडे एमएसआयडीसी बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. दरम्यान, गणपती उत्सव काही दिवसांवर आला असून यवत आणि पंचक्रोशीतील हजारो नागरिकांची या मार्गावरून ये-जा वाढणार आहे. भाविक, शाळकरी विद्यार्थी, बाजारात जाणारे नागरिक तसेच रस्त्यालगतच्या रहिवाशांना याचा मोठा त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने रस्त्याचे काम पूर्ण करून धुळीचा व अपघाताचा धोका दूर करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

> गणपती उत्सवाच्या अगोदरच हा रस्ता पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण तयारी केली होती. परंतु स्थानिक नागरिकांनी आम्हाला सहकार्य केले नाही. नागरिकांनी कामाला विरोध केला. गणपती उत्सव झाल्यावर रस्त्याचे काम शंभर टक्के आम्ही पुर्ण करणार आहोत.
> **- सुनिल अंभोरे, प्रोजेक्ट मॅनेजर**

## जारकरवाडी परिसरात कांदा लागवडीला वेग

### मजूरटंचाईमुळे 'सावड' पद्धतीचा अवलंब; वीजपुरवठ्याच्या लंपडावाचाही फटका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लाखणगाव, देवगाव, मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, खडकवाडी, बडेकरमळा, काठापूर आणि वाळुंजनगर परिसरात कांदा लागवडीला वेग आला आहे. यंदा समाधानकारक पाऊस झाल्याने रब्बी हंगामातील पिकांसाठी पाण्याची उपलब्धता वाढली असून, शेतकऱ्यांनी कांदा लागवडीला प्राधान्य दिले आहे.

गेल्या महिनाभरापासून कांद्याला चांगला बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कांदा पिकाकडे कल वाढला आहे. त्यामुळे परिसरातील शेतशिवारांमध्ये कांदा लागवडीची लगबग सुरू असून, शेतीकामांना वेग आला आहे.



**जारकरवाडी ( ता. आंबेगाव) परिसरात कांदा लागवड करताना महिला**

मात्र, एकाच वेळी मोठ्या प्रमाणात लागवड सुरू झाल्याने मजूरटंचाई निर्माण झाली आहे. उपलब्ध मजुरांकडून अधिक मजुरीची मागणी होत असल्याने लागवडीचा खर्च वाढत आहे. यावर पर्याय म्हणून अनेक शेतकरी कांदा लागवडीसाठी 'सावड' पद्धतीचा अवलंब करत आहेत.दरम्यान, कांदा लागवडीच्या काळात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडत आहे. पिकांना वेळेवर पाणी देता यावे, यासाठी वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## खामगावच्या श्री खंबेश्वर मंदिरात भक्तांची मांदियाळी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**यवत :** शेवटचा श्रावणी सोमवार असल्याने दौंड तालुक्यातील खामगाव येथील श्री खंबेश्वर मंदिरात भक्तांची मांदियाळी पहायला मिळाली. श्रावणातला चौथा आणि शेवटचा सोमवार भक्तांना आर्थिक संकटांपासून दूर नेणारा असतो, असे म्हटले जात असल्याने या सोमवारी भगवान महादेवाच्या मंदिरात प्रचंड गर्दी झाली होती. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. तत्पूर्वी पहाटे रुद्रपूजा आणि महापूजा झाली. दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी होती.

श्री खंबेश्वर मंदिरात खामगाव ग्रामस्थांकडून चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती.

दर्शनासाठी महिला, पुरुष अशा वेगवेगळ्या रांगा करण्यात आल्या होत्या. ग्रामस्थांनी फुलांनी आकर्षक मंदिर सजविलेल्याने भक्तिमय वातावरण शिवभक्तांसाठी आकर्षक ठरले. ग्रामस्थ व शिवभक्तांच्या मोठ्या सहभागामुळे खामगाव गाव परिसरात उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. खामगाव व परिसरातील हजारो शिवभक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला, ग्रामस्थांनी शिवभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या श्रद्धेने लाभ घेतला. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात खामगाव ग्रामस्थ, भाविक आणि शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नागरिकांकडू या धार्मिक उपक्रमात मोठा प्रतिसाद मिळत असून भक्तिभावाने भाविक मंदिरामध्ये दर्शनासाठी गर्दी करत आहेत. या कार्यक्रमामुळे श्री खंबेश्वर महादेव मंदिर परिसरात दिवसभर उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले.

## जनगणना २०२७साठी ४० बाबींची माहिती संकलित होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जनगणना २०२७च्या अनुषंगाने केंद्र शासनाने नागरिकांकडून विविध ४० बाबींवरील माहिती संकलित करण्याचे निर्देश जनगणना अधिकाऱ्यांना दिले आहेत. जनगणना अधिनियम, १९४८च्या कलम ८(१)नुसार हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

विहित कुटुंब पत्रकाद्वारे प्रत्येक व्यक्तीची माहिती घेतली जाणार आहे. यामध्ये नाव, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, जन्मतारीख व वय, वैवाहिक स्थिती, विवाहावेळचे वय, पती किंवा पत्नीचे नाव, राष्ट्रीयत्व, धर्म, अनुसूचित जाती-जमाती व जात यांचा समावेश आहे.याशिवाय वडील-आईचा तपशील, दिव्यांगत्व, मातृभाषा, इतर अवगत भाषा, साक्षरता व डिजिटल साक्षरता, शैक्षणिक स्थिती, उच्चतम शैक्षणिक स्तर व विषय, मागील वर्षातील कामाची स्थिती, व्यवसाय, आर्थिक कार्याची वर्गवारी, उद्योग-व्यापार-सेवेचे स्वरूप आणि कामगारांचा प्रवर्ग यांचीही माहिती घेतली जाणार आहे.काम न करणाऱ्या तसेच अंशकालीन व निम-अंशकालीन व्यक्तींसाठी बिनआर्थिक कार्य, कामाच्या शोधात असल्याची किंवा कामासाठी उपलब्धतेची माहिती नोंदविली जाईल.

## विशेष मुलांनी पोलिसांच्या मनगटावर बांधली प्रेमाची राखी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** रामलिंग रोडवरील आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या वतीने शिरूर पोलिसांसाठी 'स्ट्रेस मॅनेजमेंट' मार्गदर्शन सत्रासह रक्षाबंधन, दहीहंडी व शिक्षक दिनाचा स्नेह सोहळा उत्साहात पार पडला.या वेळी डॉ. सोनाली हार्दे आणि डॉ. मनीषा चोरे यांनी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना ताणाची लक्षणे, मानसिक आरोग्य तसेच ताण व्यवस्थापनाच्या उपायांबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.



आकांक्षा स्पेशल चाईल्ड स्कूलमधील विशेष मुलांनी स्वतः तयार केलेल्या राख्या शिरूर पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनगटावर बांधून रक्षाबंधन साजरे केले. विशेष मुलांच्या निरागस प्रेमामुळे पोलीस आणि मुलांमध्ये स्नेहाचा अनोखा बंध निर्माण झाला. यानंतर मुलांनी दहीहंडी फोडून आनंदोत्सव साजरा केला.

शिक्षक दिनानिमित्त आकांक्षा स्पेशल चाईल्ड स्कूलच्या मुख्याध्यापिका आरती बोऱ्हाडे, विशेष शिक्षक कुणाल बिडगर, विशेष शिक्षक दत्तात्रय दुबे तसेच मदतनीसांचा सन्मान करण्यात आला.

ताण टाळता येत नाही; मात्र त्याला सामोरे जाण्याची पद्धत बदलता येते, असा संदेश या वेळी देण्यात आला. आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या संस्थापिका ॲड. रानी चोरे यांनी उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी, पालक, शिक्षक व मान्यवरांचे आभार मानले.

## घरफोड्या करणाऱ्यास अटक; सहा गुन्हे उघड

**घोडेगाव :** आंबेगाव तालुक्यात बंद घरे, हॉटेल तसेच घराबाहेर ठेवलेले तांब्याचे बंब, भांडी व शेगड्या चोरी करणाऱ्या चोरट्यास स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण आणि घोडेगाव पोलिसांनी संयुक्त कारवाईत अटक केली. या कारवाईत तीन घरफोडी व तीन चोरीचे असे एकूण सहा गुन्हे उघडकीस आले असून, पोलिसांनी सुमारे साडेसहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत पोलिसांनी शहाजी ज्ञानदेव सोनवणे (वय २४, रा. पंचलिंगवस्ती, जुन्नर) याला चिंचोली कोकणे येथे महिंद्रा विरो टेम्पोसह ताब्यात घेतले.



चौकशीत त्याने केलेल्या सहा गुन्ह्यांची माहिती समोर आली.

आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेला महिंद्रा विरो टेम्पो तसेच तांब्याचे बंब, भांडी, शेगड्या आदी साहित्य असा एकूण ६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर व घोडेगाव पोलिसांच्या पथकाने केली.

## भुलेश्वर यात्रेची तेल्या भुत्याच्या कावडीने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील माळशिरस येथील भुलेश्वर देवस्थानच्या यात्रेची श्रावणातील चौथ्या सोमवारी सासवड येथील मानाच्या तेल्या भुत्याच्या कावड मिरवणुकीने भक्तिमय वातावरणात सांगता झाली. यावेळी मंदिरातील शिवलिंगाची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. दिवसभरात दीड लाखांहून अधिक भाविकांनी रांगेत उभे राहून दर्शन घेतले.

पहाटे शिवलिंगास दही, दूध व पंचामृताने अभिषेक करण्यात आला. सकाळी पाच वाजता माळशिरस ग्रामस्थांच्या वतीने माजी सरपंच अरुण यादव आणि महिंद्रा कंपनीचे व्यवस्थापक भानुदास माने यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले.



**श्री क्षेत्र भुलेश्वर येथील मानाची कावड मिरवणुक. इन्सेटमध्ये श्री भुलेश्वर शिवलिंग.**

सकाळी पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप, दक्षिण-मध्य मुंबईचे माजी खासदार राहुल शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विजय कोलते, पुरंदर शिवसेनेच्या ममता शिवतारे, गौरव कोलते, रश्मी कोलते आणि पंचायत समिती सदस्य माऊली यादव यांनी दर्शन घेतले.

रविवारी सासवड येथून मानाची तेल्या भुत्याची कावड वाजतगाजत माळशिरस येथे आणण्यात आली. सोमवारी सकाळी कावड मिरवणूक भुलेश्वर देवस्थान येथे नेण्यात आली. दुपारी पाण्याच्या कुंडाजवळ भुलेश्वरास अभिषेक करून महाआरती करण्यात आली. त्यानंतर कावड मिरवणूक काढण्यात आली. राजेवाडी, आंबळे, राजुरी, यवत, पोंढे आदी ठिकाणांहून आलेल्या कावडींसोबत टाळ-मृदंगाच्या गजरात पालखी मिरवणूक काढण्यात आली.

दुपारी चार वाजता मंदिराच्या प्रवेशद्वारावर मानाच्या कावडींची धार घालण्यात आली. पालखीची महाआरती झाल्यानंतर यात्रेची सांगता करण्यात आली.

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळवण्यात येते की, श्रीमती माया कैलास शेळके राहणार मुक्काम पोस्ट संतवाडी आळे, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे - 412411.

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH -14-FS-6241 असे असून सदर चारचाकी वाहन, त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पती कैलास गेनभाऊ शेळके यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-09/09/2026

**श्री कैलास गेनभाऊ शेळके**
मुक्काम पोस्ट संतवाडी आळे,
तालुका जुन्नर, जिल्हा
पुणे - 412411.

# राशीनच्या मंगळवार बाजारावर दुष्काळाचे सावट!

## ग्राहकांची पाठ, व्यापाऱ्यांची उलाढाल मंदावली

**ऋषभ परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी हवालदिल झाला असून, त्याचा थेट फटका आता राशीनच्या आठवडे बाजारालाही बसू लागला आहे. आजच्या मंगळवार बाजारात नेहमीची गर्दी गायब झाल्याने बाजारपेठेत अक्षरशः शुकशुकाटाचे चित्र पाहायला मिळाले.

पावसाअभावी शेतातील पिके करपू लागली असून, शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. पिके वाचतील की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत असतानाच या दुष्काळी परिस्थितीचा परिणाम बाजारपेठेतील व्यवहारावरही स्पष्टपणे जाणवत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाअभावी खरिपाच्या पिकांना फटका बसत असल्याचे अलीकडील वृत्तांतही समोर आले आहेत. राशीनच्या मंगळवार बाजारात भाजीपाला, मिठाई, किराणा कपड्याचे दुकाने तसेच विविध प्रकारची दुकाने थाटलेली होती; मात्र दुकानदार तयार आणि ग्राहक गायब, अशी परिस्थिती दिसून आली. ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याचा परिणाम बाजारपेठेतील खरेदी-विक्रीवर होत आहे.

एकीकडे वाढती महागाई, दुसरीकडे पावसाचा लपंडाव आणि त्यात पिकांवर आलेले संकट, अशा तिहेरी कोंडीत शेतकरी अडकला आहे. भाजीपाल्याला अपेक्षित भाव मिळत नसल्याने उत्पादकही अडचणीत आहेत. त्यामुळे बाजारात आवक असूनही ग्राहकांची खरेदी कमी आणि व्यापाऱ्यांची उलाढाल मंदावल्याचे चित्र आहे.



**शेतकऱ्यांची नजर आभाळाकडे!**

पाऊस वेळेवर न झाल्यास उभी पिके हातची जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. आता पाऊस पडला तरच पिकांना जीवदान मिळेल, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. लवकरात लवकर दमदार पाऊस पडावा आणि शेतीसह बाजारपेठेलाही पुन्हा उभारी मिळावी, अशीच अपेक्षा राशीन परिसरातील शेतकरी व व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

पाऊस नाही तर शेती संकटात; शेती संकटात तर बाजारपेठ ठप्प! राशीनच्या मंगळवार बाजारातील आजचे चित्र ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दुष्काळाच्या वाढत्या सावटाची जणू धोक्याची घंटाच ठरले आहे.

## द•ख•ल



### रूपीबाई बोरा विद्यालयात विद्यार्थ्यांनी चालवली शाळा

**नगर तालुका :** विद्यार्थी पर्यवेक्षक माईक वरून सूचना देत आहे. छात्र मुख्याध्यापिका शाळेचे नियोजन पाहत आहे. छात्र शिक्षक शिक्षिका वर्गांमध्ये तन्मयतेने अध्यापन करत आहेत. असे वातावरण होते अहिल्यानगर येथील अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित केलेल्या शिक्षक दिनानिमित्त. कार्यक्रमास प्रशालेचे उपप्राचार्य विष्णू गिरी, पर्यवेक्षक अरविंद आचार्य, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सुधीर टेमकर, उपाध्यक्षा माधुरी चोभे, निमंत्रक नीता ननवरे उपस्थित होते. प्रास्ताविक राजनंदिनी निंबाळकर हिने केले. अध्यक्षांचा परिचय यशश्री घोगरे हिने करून दिला तर प्रमुख अतिथींचा परिचय प्रांजल शिंदे हिने करून दिला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या बद्दल तसेच गुरु शिष्य परंपरेबद्दल मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्रजी या भाषेत अनुक्रमे कु. कादंबरी हातरुणकर, चि. अर्णव गावडे, कु. श्रावणी खांडकेकर व समृद्धी करंजुले यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कु. श्रावणी तेलंग, कु. श्रावणी काकडे व कु. श्रावणी सूर्यवंशी यांनी केले तर आभार कु. सोनाली वाळके हिने मानले. कार्यक्रमास पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा माधुरी चोभे,पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी, माजी शिक्षक, प्रशालेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षकांच्या भूमिका



**टाकळीमानूर :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळीमानूर येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत एक दिवस विद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज सांभाळले. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती असलेला आदर, प्रेम व कृतज्ञता अनोख्या पद्धतीने व्यक्त केली. यावेळी शिक्षक मनोगत व्यक्त करताना प्रविण गावडे यांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षक व विद्यार्थ्यांनी काळानुरूप बदलणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच जीवनात वेळेचे नियोजन आणि वेळेचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समीर नरसाळे यांनी शिक्षक दिनाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व विविध जबाबदाऱ्या उत्स्फूर्तपणे पार पाडत शिक्षकांच्या भूमिकेचा अनुभव घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन झेंड अनुष्का हिने, तर आभारप् ढाकणे प्रतीक्षा हिने केले. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त घेतलेला पुढाकार आणि आपल्या शिक्षकांचा केलेला सन्मान हा विद्यालयातील गुरु-शिष्य नात्याची सुंदर अनुभूती देणारा ठरला. गुरुजनांच्या मार्गदर्शनातून मिळालेले संस्कार आणि ज्ञान हेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची खरी शिदोरी आहे, असा संदेश देणारा हा शिक्षक दिनाचा सोहळा विद्यालयात उत्साहात व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

### श्री गजानन विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात




**ढोरजळगांव :** श्री गजानन माध्य व उच्च माध्य विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात आराध्य दैवत श्री गणेश आणि डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.आजच्या संपूर्ण दिवसाचं कामकाज विद्यार्थी शिक्षक यांनी पाहिलं. विद्यार्थी प्राचार्या-कु.लोखंडे खुशी हिने आपले मनोगत व्यक्त करताना शाळेचं कामकाज सांभाळणं हे कठीण आहे याचा अनुभव मला मिळाला.तसेच विद्यार्थी शिक्षक कु. पुंडेकर जान्हवी,कु.तागड स्नेहल,चि.दिंडे चैतन्य यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याबद्दल माहिती दिली शिक्षक हा समाजाचा एक घटक असतो.शिक्षक म्हणजे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारा व्यक्ती नसून तो समाजाच्या सुप्त मनाला आधार देणारा शिल्पकार आहे.शिक्षक होणं तितकं सोपं नाही हे विद्यार्थी शिक्षक झालेले सर्व विद्यार्थ्यांना अनुभव घेतला आणि तो अनुभव व्यक्त केला. यावेळी प्राचार्य रमेश लांडे, विजय कोळगे, कैलास जाधव, संदीप झाडे, अण्णासाहेब माळी, सुरेश भोजने आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. आहेर धनश्री व आहेर कार्तिकी यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा योगेश नरवडे यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादीचे शेवगाव तालुका प्रमुख नेमाने यांना पितृशोक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील चापडगाव येथील रहिवाशी व गावचे ज्येष्ठ मार्गदर्शक साहेबराव भुजंगराव नेमाने पाटील यांचे नुकतेच दीर्घ आजाराने वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले आहे. अत्यंत स्वज्वळ विचार सरणी असणारे नेमाने हे चापडगांव गावचे सलग ४ पंचवार्षिक सरपंचपद भूषविलेले या काळात त्यांनी गावाच्या विकास कामात कायम भर टाकण्याचे मोठे काम केलेले आहे. तसेच स्व. मारुतराव घुले पाटील यांचे कायम कट्टर समर्थक म्हणून ओळखलेजात होते. त्यांच्या अंत्यविधीसाठी विविध क्षेत्रातील मोठा जनसमुदाय व असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. तसेच त्यांच्या निधनामुळे चापडगावसह पंचक्रोशीत हळ - हळ व्यक्त होत असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेवगाव तालुका प्रमुख कल्याणराव नेमाने व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शिवाजीराव नेमाने यांचे ते वडील होते.

# गणेशोत्सवात 'डीजे बंद'चा पोलिसांचा निर्धार!

## डीजे वाजवल्यास मंडळासह चालकावर गुन्हा; डीजे जप्त करण्याचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगर तालुका पोलीस ठाण्यात गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करताना डीजेचा वापर पूर्णपणे टाळावा असे आवाहन तालुका पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी केले. डीजे वाजवल्यास संबंधित गणेश मंडळ आणि डीजे चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल तसेच डीजे जप्त केला जाईल असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

गणेशोत्सवात पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य देण्याचे आवाहन पोलिसांनी केले. गावागावात भजन, कीर्तन, व्याख्याने, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून गणेशोत्सव अधिक विधायक पद्धतीने साजरा करावा असे वारुळे यांनी सांगितले.



नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत ६९ गावे असून प्रत्येक गावातील ग्रामस्थ, गणेश मंडळे, पदाधिकारी, ग्रामपंचायत प्रशासन आणि पोलिसांनी परस्पर सहकार्य करणे गरजेचे आहे. 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविण्यासाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा. ही संकल्पना प्रभावीपणे राबविणाऱ्या गावांना बक्षीस देण्यात येईल अशी माहितीही त्यांनी दिली.

गावातील डीजे बंद करण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन करताना वारुळे म्हणाले की डीजेमुळे होणाऱ्या मोठ्या आवाजाचा परिणाम लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच विद्यार्थ्यांवर होतो. ध्वनी प्रदूषणामुळे आरोग्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात ध्वनी प्रदूषण टाळणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

गावात नियमांचे उल्लंघन करून डीजे वाजविला जात असल्यास नागरिकांनी तत्काळ नगर तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असेही त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सव आनंदात, शांततेत आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत साजरा करण्याचे आवाहन पोलिसांनी केले.

# जेऊरला आता लांब पल्ल्याच्या बसगाड्यांनाही थांबा!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर मार्गावरील जेऊर (बा.) येथे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याने लांब पल्ल्याच्या तसेच मार्गावरून धावणाऱ्या सर्व एसटी बसगाड्यांना जेऊर येथे थांबा देण्याच्या सूचना राज्य परिवहन विभागाने दिल्या आहेत. त्यामुळे जेऊर व परिसरातील विद्यार्थी, महिला, वृद्ध नागरिक तसेच रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जेऊर येथे बसथांबा असतानाही अनेक बसगाड्या थांबत नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तसेच नागरिकांना विविध कामांसाठी अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर व इतर शहरांकडे जाताना अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः सकाळच्या वेळेस शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आणि रात्रीच्या वेळी परतीच्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती.

याबाबत निवृत्त पोलिस अधिकारी भानुदास हसनाळे यांनी गांभीर्याने लक्ष वेधत मंत्रालयापर्यंत पाठपुरावा केला. त्यांच्या मागणीची दखल घेत राज्य परिवहन विभागाच्या अहिल्यानगर विभागाने संबंधित आगारांना जेऊर येथे प्रवासी व विद्यार्थी चढ-उतार करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यामुळे अनेक दिवसांपासूनची प्रवाशांची मागणी आता मार्गी लागली आहे.




तारकपूर, नेवासा, श्रीगोंदा, पाथर्डी आणि शेवगाव या आगारांच्या व्यवस्थापकांना अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर मार्गावर धावणाऱ्या बसगाड्यांनी जेऊर येथे थांबून प्रवासी व विद्यार्थ्यांना चढ-उतार करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, यवतमाळ, अकोला, जळगाव आदी आगारांमधून धावणाऱ्या मार्गावरील बसगाड्यांनाही जेऊर येथील थांब्याचा लाभ प्रवाशांना मिळावा यासाठी संबंधित चालक-वाहकांना सूचना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जेऊर परिसरातील अनेक विद्यार्थी अहिल्यानगर येथील शाळा, महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेतात. बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. आता बसगाड्या जेऊर येथे थांबणार असल्याने विद्यार्थ्यांची ही धावपळ कमी होणार आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी जेऊरला उतरणाऱ्या महिला व वृद्ध प्रवाशांसाठी हा निर्णय सुरक्षिततेच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरणार आहे.

# सोबलेवाडीच्या महादेव मंदिरात सभामंडपाचे लोकार्पण उत्साहात



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** पारनेर तालुक्यातील सोबलेवाडी येथील श्री क्षेत्र सोबलेवाडी महादेव मंदिरात चौथा सोमवार निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या सभामंडपाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या मा. सुनीताताई सोबले यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी भाऊ शेरकर, मच्छिंद्र बोरुडे, अंकुश चौधरी, जमण्याबापू सोबले, संदीप शेळके, मच्छिंद्र शेळके, विलास शेरकर, आप्पा शेरकर, किसन शेरकर, शिवाजी सोबले, दगडू महाराज शेळके, मोहन शेळके, बबन बोरुडे, मळीभाऊ ठाणगे, सोपान देशमाने, मीनाताई शेरकर, विजया म्हस्के, गौरी शेळके, मोनिका शेळके, वनिता शेळके, आशा शेरकर, राजू धों. शेरकर, कमल शेळके, लताबाई कावरे, स्वप्नाली शेळके, शोभा शेळके, आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी अभिषेक व होम-हवनाने झाली. त्यानंतर ह.भ.प. माऊली महाराज शेळके (सोबलेवाडीकर) यांचे प्रवचन झाले. प्रवचनातून भगवान महादेवाची भक्ती, अध्यात्मिक जीवनाचे महत्त्व तसेच समाजाने धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्याची गरज याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

# 'डीजे' मुक्त गणेश विसर्जन करण्याचे पोलिस अधीक्षकांचे मंडळांना आवाहन

## शांतता समितीच्या बैठकीत व्यसनमुक्तीसह 'एक गाव, एक गणपती'चा आग्रह

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** या वर्षीचे गणपती १२ दिवस राहणार असून विसर्जनाच्या वेळी शहरासह तालुक्यातील सर्वच गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्य वाजवण्याकडे कल देऊन आपल्या गणपती विसर्जनाची मिरवणूक डीजे मुक्त व शांततेत कशी पार पडेल या साठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक सुदर्शन मूम्मका यांनी शेवगाव शहरासह तालुक्यातील सर्वच गणेश मंडळाच्या प्रतिनिधींना केले आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियोजन आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शेवगाव येथे प्रशासनाच्या वतीने शांतता समितीची बैठक घेण्यात आली.



शहरातील रस्त्यांवरील खड्डे, उघड्या गटारी, पथदिवे, अवैध धंदे, मद्यविक्री, डीजेचा वापर आणि गणेश विसर्जनाच्या नियोजनाचा मुद्दा गणेश मंडळांच्या प्रतिनिधींनी आक्रमकपणे उपस्थित केला.

गणेश मंडळांना उत्सवासाठी समान वेळ देण्यात यावा, नगरपरिषदेने आवश्यक ठिकाणी पथदिवे सुरू करावेत, डीजेला पूर्णपणे बंदी घालून पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, अशी भूमिकाही मंडळांच्या अनेक प्रतिनिधींनी मांडली. शहरातील रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, गणेश विसर्जन मिरवणुकीचे मार्ग सुस्थितीत करावेत आणि अनेक ठिकाणी उघड्या असलेल्या गटारी बंदिस्त कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. तसेच गणेशोत्सव काळात तालुक्यातील एकाही गावात अवैध धंदे, जुगार, मटका तसेच मद्यविक्री चालणार नाही व जे असे धंदे करणारे आढळून येतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली.

नदीपात्रात जाऊ नये, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि उत्सव शांततेत पार पाडावा, असेही सांगितले. बैठकीस पोलिस उपअधीक्षक नीरज राजगुरू, तहसीलदार आकाश दहाडदे, पोलिस निरीक्षक मोहन बोरसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रल्हाद पाठक, महावितरणचे विश्वास नरके, वनविभागाचे आदिनाथ घनवट यांच्यासह गणेश मंडळांचे अध्यक्ष, नगरसेवक, महिला भगिनी व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्कृष्ट गणेश मंडळांना अनुक्रमे ११ हजार व ५ हजार रुपयांचे पारितोषिक नगर परिषदेच्या वतीने देण्यात येणार असल्याचे अरुण मुंडे यांनी सांगितले.

# जेऊरच्या भवानीमाता डोंगरावर मेंढरांचे कळप!

## वनस्पती, झाडांना धोका; वनसंपदेच्या नुकसानीची तक्रार; कारवाईची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** जेऊर परिसरातील भवानी माता डोंगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बाहेरगावाहून आलेल्या मेंढरांच्या मोठ्या कळपामुळे वनसंपदेचे नुकसान होत असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत ग्रामपंचायतीकडे निवेदन देऊन संबंधित मेंढपाळावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जेऊर परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने स्थानिक पशुपालकांसमोर चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

**वनसंपदेचे संरक्षण करण्याची मागणी**

दुष्काळी परिस्थितीत परिसरातील नैसर्गिक चारा व वनसंपदा जपणे गरजेचे आहे. भवानी माता डोंगर परिसरात मेंढरांचे कळप येत असल्यास त्याची पाहणी करून वनविभाग व ग्रामपंचायतीने योग्य ती कार्यवाही करावी. वनसंपदेचे नुकसान थांबवून स्थानिक पशुपालकांना दिलासा द्यावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

अशा परिस्थितीत बाहेरगावाहून मोठ्या संख्येने मेंढरांचे कळप परिसरात दाखल होत असल्याने उपलब्ध चाऱ्यावरही ताण पडत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. स्थानिक पशुपालकांना जनावरांसाठी चारा मिळणे कठीण झाले असताना बाहेरून आलेल्या कळपांमुळे अडचणी वाढत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

भवानी माता डोंगर परिसरातील वनविभागाच्या हद्दीबरोबरच खासगी क्षेत्रातील झाडे, झुडपे तसेच विविध औषधी वनस्पतींचेही मेंढरांमुळे नुकसान होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मोठ्या कळपामुळे डोंगर परिसरातील नैसर्गिक वनसंपदेवर परिणाम होत असून या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.



संबंधित मेंढपाळाकडून ग्रामस्थांशी अरेरावी केली जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनावर बाजीराव काळे, शुभम मगर, पोपट तवले, गणेश काळे, अण्णासाहेब मगर, राहुल तवले, किसन काळे, गोरख काळे, रवींद्र तवले, पांडुरंग तवले, बाळासाहेब तवले, भास्कर गोसावी, शब्बीर शेख, रामदास तवले, ज्ञानेश्वर मुंगसे, रोहिदास मगर, पोपट मगर यांच्या सह्या आहेत.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



## सीसीटीव्हीमुळे सुरक्षेला बळ; पोलीस नि. प्रताप दराडे यांचा सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**


छाया-सुधीर चव्हाण नेवासा

**नेवासा** : पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी नेवासा पोलीस स्टेशनची सूत्रे हाती घेताच नेवासा शहराच्या मुख्य चौकात तसेच नेवासाफाटा,कुकाणा येथे मुख्य ठिकाणी लोकवर्गणीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसवले व कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ठोस पावले उचलली त्याबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे,डीवायएसपी नीरज राजगुरू,तहसीलदार डॉ.संजय बिरादार आदी दिसत आहे.

# कोपरगावातील दलितांच्या इनाम जमीन घोटाळा

## शिर्डीत अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : कोपरगाव येथील दलित समाजाच्या इनाम जमिनी बेकायदेशीररित्या लाटून जमीनीचा महाघोटाळा करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत वंचित बहुजन आघाडी, उत्तर अहिल्यानगर जिल्हाच्या वतीने बेमुदत धरणे आंदोलन पुकारण्यात आले आहे. वंचितच्या प्रकाश दुशिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार मौजे कोपरगाव येथील सर्व्हे नंबर ५, ६, ७ आणि ८ या जमिनी मूळ दलित समाजाच्या वहिवाटीच्या आहेत. १९३४ सालच्या सातबारा उताऱ्यावर या जमिनींवर मूळ वहिवाटदार म्हणून दलित बांधवांची नावे स्पष्टपणे नमूद आहेत.




मात्र महसूल दफ्तरात फेरफार करून आणि खोटी कागदपत्रे तयार करून या जमिनी लाटण्यात आल्या आहेत. ज्या इसमांनी या जमिनीवर अतिक्रमण केले आहे त्यांच्यावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच सध्या चालू असलेल्या सातबारावर पुन्हा १९३४ सालावरील मूळ वहिवाटदारांची नावे लावून देण्यात यावीत अशी मागणी वंचितने केली आहे.

या संपूर्ण जमीन गैरव्यवहार प्रकरणाची सीबीआय किंवा ईडी मार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी आणि या महाघोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी ठाम भूमिका आघाडीने घेतली आहे. जोपर्यंत प्रशासन या मागण्यांवर ठोस निर्णय घेत नाही तोपर्यंत धरणे आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

# ब्राम्हणीत अमरनाथची प्रतिकृती; बाबा बर्फानीचे दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : चौथ्या श्रावणी सोमवारनिमित्त ७ सप्टेंबर रोजी ब्राम्हणी येथे अमरनाथ शिवलिंगाची प्रतिकृती साकारण्यात आली. यामध्ये बर्फापासून साकारण्यात आलेल्या आकर्षक शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील शिवभक्तांनी रात्री उशिरापर्यंत मोठी गर्दी केली. 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता.




बर्फाचे शिवलिंग आणि आकर्षक फुलांची सजावट,विद्युत रोषणाईमुळे भाविकांना जणू अमरनाथमध्येच भगवान भोलेनाथाचे दर्शन घेत असल्याचा अनुभव मिळाला. शिवभक्तांसाठी अमरनाथ यात्रा हे श्रद्धेचे मोठे स्थान आहे. प्रत्यक्ष अमरनाथला जाता न आल्याने ब्राम्हणीतच अमरनाथची प्रतिकृती व बर्फाचे शिवलिंग साकारल्याने परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

श्रावणातील शेवटच्या सोमवारच्या पार्श्वभूमीवर साकारण्यात आलेल्या या धार्मिक उपक्रमामुळे ब्राम्हणी परिसराला अमरनाथचे स्वरूप प्राप्त झाले होते. शिवभक्त सुरेश हापसे,ऋषिकेश गाढे, सारंगधर देशमुख यांच्या संकल्पनेतून व सहकारी शिवभक्तांच्या सहकार्यातून अमरनाथ शिवलिंगाची प्रतिकृती साकारण्यात आली. सोमवारी मध्यरात्रीपर्यंत फोटो काढण्यासाठी शिवभक्तांनी गर्दी केली.

# 'साहेबांचा दौरा' चकाचक | कागदी नियोजनात वास्तव हरवले !

## वैजापूरच्या हतबल शेतकऱ्याच्या डोळ्यात अश्रू कायम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : प्रशासन आणि शासन नेहमीच शेजाऱ्याच्या दारापर्यंत पोहोचल्याचा दावा करत असते, पण शुक्रवारी वैजापूर तालुक्यात घडलेला कृषी सचिवांचा दौरा म्हणजे केवळ एक हायप्रोफाईल 'प्रोटोकॉल'चा सोहळा ठरला. एका बाजूला हिरवेगार मका प्रयोग आणि अधिकाऱ्यांचा गोतावळा, तर दुसरीकडे पावसाच्या दीर्घ खंडाने हतबल झालेला बळीराजा आणि जळून खाक झालेली पिके अशी दोन टोकाची विदारक चित्रे समोर आली.

मात्र, या दौऱ्यात दुर्दैवाचा भाग असा की, सचिवांच्या नजरेसमोर फक्त पूर्वनियोजित प्रयोग आणि कागदोपत्री यश आणले गेले; ज्या बांधावर जाऊन खरीप संकटाची दाहकता पाहणे गरजेचे होते, त्या करपलेल्या शेतापर्यंत जाण्याची तसदी कोणीही घेतली नाही.

### नियोजनाचा बडेजाव अन् वास्तवाशी फारकत

माळी वडगाव ते धोंदलगाव आणि त्यानंतर वैजापूर कार्यालय असा हा दौरा मिनिटस्टॅम्प नियोजनानुसार पार पडला. ब्रह्मास्त्र, जीवामृत, शून्य मशागत आणि कापसाची घन लागवड यांसारख्या प्रयोगांची जमेची बाजू मांडण्यासाठी स्थानिक यंत्रणेने चोख तयारी केली होती. दुपारी ३:४५ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम रात्री ९:१५ वाजता हलक्या फुलक्या निरोपाने संपला. पण या सगळ्या राजकीय व प्रशासनिक घडामोडीत खरीप वाया गेलेला आणि नैराश्यात गेलेला सर्वसामान्य शेतकरी या संपूर्ण प्रवासातून पद्धतशीरपणे वगळण्यात आला.

### शासकीय अहवालात आत्ममग्नता; संकटाचा पत्ताच नाही

कृषी विभागाकडून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात अधिकाऱ्यांच्या पाट्या टाकणाऱ्या भेटी आणि शेतकरी गटांच्या नावांचे गोषवारे भरभरून छापण्यात आले आहेत. परंतु, पावसाच्या दीर्घ खंडाने तालुक्यात नेमके किती हेक्टर क्षेत्र बाधित झाले, शेतकऱ्यांच्या तोंडचा घास कसा हिरावला गेला आणि यावर तात्काळ काय उपाययोजना असणार आहेत, याचा कोणताही ठोस हिशेब यात देण्यात आलेला नाही. खुद्द कृषी सचिवांकडूनही या बिकट परिस्थितीवर कोणतीही विशेष पावले उचलण्याचे निर्देश मिळाले नसल्याने, वैजापूरच्या शेतकऱ्यांच्या पदरी केवळ निराशाच पडली आहे. कागदावर सर्व काही आटोपशीर असल्याचा देखावा उभा राहिला असला, तरी प्रत्यक्षात निसर्गाच्या फेऱ्यात सापडलेला बळीराजा मदतीपासून कोसो दूर उभा आहे.

# दरोड्याच्या तयारीतील टोळीवर पोलिसांचा छापा; दोघे जेरबंद

## ११ जण अंधाराचा फायदा घेत फरार; हत्यारांसह साहित्य जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील कुरणवाडी परिसरात दरोड्याच्या तयारीत असलेल्या १३ दरोडेखोरांचा राहुरी पोलीस पथकाने पाठलाग करुन त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. पथकाने दोन जणांना हत्यारासह पकडून ताब्यात घेतले. मात्र बाकीचे दरोडेखोर अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. राहुरी तालुक्यातील कुरणवाडी येथे शेतकऱ्यांच्या मोटारीचे केबल चोरीचे प्रमाण खुप वाढले आहे. चोरी करणारे इसमांची संख्या जास्त प्रमाणात असुन ते नेहमी त्यांचे सोबत धारदार शस्त्रे बाळगुन असतात.

त्यामुळे ते शेतकऱ्यांच्या जिवाची बरे वाईट करतील, म्हणुन शेतकरी घाबरुन त्यांचे जवळ जात नाहीत व सदर चोरांचे विरोधात आम्ही पोलीस स्टेशनला अनेक गुन्हे नोंद केले आहेत. तरी सदरचे चोरी करणारे चोर हे नेहमी प्रमाणे रात्री त्यांचेकडे घातक हत्यारांसह परीसरात मोठा दरोडा घालण्याचे तयारीत असुन ते त्याच उददेशाने कुरणवाडी मुळा धरण बॅक वॉटर परीसरात फिरत आहेत. अशी माहीती प्राप्त झाल्यानंतर पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक गणेश वाघमारे, हवालदार प्रवीण बागुल, नदीम शेख, सचिन ताजणे, गणेश सानप, गिते, चालक शेख आदि पोलिस पथकाने दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे २.४५ वाजे दरम्यान कुरणवाडी येथे जाऊन परीसरातील काही शेतकऱ्यांसह कुरणवाडीतील बारागाव नांदुर रस्त्यावरील जंगलात दबा धरुन बसले.

त्यावेळी १० ते १२ जण रस्त्याने जात असताना पोलिस पथक व ग्रामस्थांनी त्यांना घेराव घातला. पथकाने दोन जणांना ताब्यात घेतले मात्र बाकीचे अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. चंद्रभान छबु पवार, वय २० वर्षे, गणेश विलास बर्डे, वय १८ वर्षे, दोघे रा. बारागाव नांदुर, ता. राहुरी. अशी पकडलेल्या आरोपींची नावे असून त्यांच्या ताब्यातून धारदार कत्ती, चाकू, लोखंडी रॉड, मिरची पूड, व्हेक्सा ब्लेडपाण, कटर व पक्कड अशी हत्यारे जप्त करण्यात आली. तर गोविंद विश्वनाथ बर्डे, वय ३५ वर्षे, विजु किसन बर्डे, वय ३० वर्षे, रोहीत अर्जुन बर्डे, अर्जुन बापु पवार, वय २१ वर्षे, सागर अनिल बर्डे, वय १८ वर्षे, कार्तिक सुरेश बर्डे, वय १८ वर्षे, अमर अशोक बर्डे, वय २० वर्षे, कृष्णा विलास बर्डे, वय १८ वर्षे, करण विश्वनाथ बर्डे, रवि कैलास बर्डे, अक्षय किसन बर्डे, सर्व रा. बारागाव नांदुर, ता. राहुरी हे अकराजण फरार झाले आहेत. राहुरी पोलिस पथकाकडून त्यांचा शोध सुरु आहे.

पोलिस हवालदार गणेश सानप यांच्या फिर्यादीवरून तेरा आरोपींवर गुन्हा रजि. नं. १००१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३१० (४), ३१० (५) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४, २५ प्रमाणे आर्म क्टचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख करीत आहेत.

# श्रीरामपूरच्या पत्रकारांचा ऐक्याचा निर्धार

## मराठी पत्रकार संघ, श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी करण नवले, ॲड. बाळासाहेब आगे कार्याध्यक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहर व तालुक्यातील पत्रकारांमध्ये शहरी-ग्रामीण, छोटे-मोठे तसेच प्रिंट-इलेक्ट्रॉनिक माध्यम असा कोणताही भेदभाव न ठेवता सर्व पत्रकारांनी एकदिलाने काम करण्याचा निर्धार केला. श्रीरामपूर येथील व्ही. आय.पी. विश्रामगृहात झालेल्या बैठकीत मराठी पत्रकार संघ, श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार रमण मुथा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस संघाचे मार्गदर्शक रमेश कोठारी, नागेश सावंत, सुनील कुलकर्णी तसेच संस्थापक अध्यक्ष प्रदीप आहेर उपस्थित होते.



यावेळी संघाच्या कार्यकारी मंडळाचीही निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी दैनिक जय बाबाचे संपादक ड. बाळासाहेब आगे, उपाध्यक्षपदी मनोज आगे व महेश रक्ताटे, सचिवपदी सुरेश कांगुणे, खजिनदारपदी राहुल मुथा आणि संघटकपदी भाऊसाहेब काळे यांची एकमताने निवड झाली. तसेच सहसचिवपदी सलीमखान पठाण, सहखजिनदारपदी सचिन उघडे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून प्रदीप आहेर, सुनील कुलकर्णी, जयेश सावंत आणि पूनम करण नवले यांचा समावेश करण्यात आला. नवनिर्वाचित अध्यक्ष करण नवले यांनी यावेळी बोलताना, पत्रकार संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांमध्ये समानतेची भावना अधिक बळकट करण्याची गरज व्यक्त केली.

पत्रकारितेची गरिमा आणि विश्वासार्हता जपतानाच पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी संघटितपणे आवाज उठविणे, पत्रकारांसाठी प्रशिक्षण उपक्रम राबविणे तसेच शासनाच्या पत्रकारांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. शहर असो अथवा ग्रामीण भाग, वर्तमानपत्र असो अथवा इलेक्ट्रॉनिक मीडिया, छायाचित्रकार असो व जाहिरात प्रतिनिधी, प्रत्येक पत्रकार हा संघटनेचा समान घटक आहे.

पत्रकारांच्या हितासाठी सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून एकदिलाने काम केले पाहिजे, असे आवाहन नवले यांनी केले. यावेळी पत्रकार संतोष बनकर, देविदास देसाई, साईनाथ बनकर, दिलीप तांबे, नितीन चित्ते, महेश देशपांडे, दिलीप दायमा, किशोर साळुंके, मंगेश लबडे, अमोल कदम, जयराज रणदिवे, सुधीर लोळगे, शंतनु हरकल यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले. संघाच्या नव्या कार्यकारिणीचे उपस्थित पत्रकारांनी अभिनंदन करून आगामी काळात श्रीरामपूर तालुक्यातील पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पुतणीच्या छेडछाडीचा राग; काकावर जीवघेणा हल्ला

## लोणी पोलिसांकडून दोघांना अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : पुतणीला त्रास देऊन धमकावल्याचा जाब विचारल्याच्या रागातून तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना लोणी खुर्द येथील ब्राम्हणे वस्ती परिसरात घडली. या प्रकरणी लोणी पोलिसांनी दोन संशयित आरोपींना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



मुख्य आरोपी विकी राक्षे याच्यासह अन्य साथीदार फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे. ५ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ८.१० वाजता नागेश शंकर लोट (३८, रा. लोणी खुर्द) हे ड्युटी संपवून दुचाकीवरून घरी जात होते. पी.व्ही.पी. कॉलेजजवळील ब्राम्हणे वस्ती परिसरात दोन दुचाकींवरून आलेल्या चार ते पाच जणांनी त्यांची दुचाकी अडवली. त्यानंतर चाकू, तलवार व लोखंडी पाईपने लोट यांच्या हातावर, पाठीवर व डोक्यावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. त्यांच्यावर प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथे उपचार सुरू आहेत. या प्रकरणी त्यांचे बंधू नवीन शंकर लोट यांच्या फिर्यादीवरून लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५९/२०२६ दाखल करण्यात आला. दरम्यान, उपचारादरम्यान ७ सप्टेंबर रोजी नागेश लोट यांनी दिलेल्या जबाबात विकी राक्षे हा त्यांच्या पुतणीला त्रास देत व धमकावत असल्याचे सांगितले.

त्यामुळे पुतणीचे सिमकार्ड काढून तिला पुणे येथे नातेवाईकांकडे पाठविल्याने राक्षे याने रागातून हल्ला घडवून आणल्याचा आरोप त्यांनी केला. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी सागर कांतीलाल उल्हारे (२७) व विठ्ठल उर्फ बंटी माणिक गर्जे (२४) यांना अटक केली. चौकशीत हल्ला विकी राक्षेच्या सांगण्यावरून केल्याची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. हल्ल्याचा कट, आर्थिक व्यवहार, अन्य साथीदारांचा सहभाग तसेच हत्यारांचा तपास सुरू आहे. मुख्य आरोपी विकी राक्षे याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके कार्यरत आहेत.

# दुरगाव तलावातून अवैध पाणी उपसा; ३५ मोटारी जप्त

## कर्जत प्रांताधिकारी पथकाची धडक कारवाई; वीजपुरवठाही खंडित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : मान्सून पावसाने दडी मारल्याने उपलब्ध जलसाठा जपण्यासाठी कर्जत तालुका प्रशासनाने दुरगाव तलावातून सुरू असलेल्या अवैध पाणी उपशावर मंगळवारी (दि. ८) सकाळी धडक कारवाई केली. प्रांताधिकारी नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईत विनापरवाना पाणी उपसा करणाऱ्या तब्बल ३५ मोटारी जप्त करण्यात आल्या.



तसेच तलाव परिसरातील वीजपुरवठा महावितरणकडून खंडित करण्यात आला. मान्सूनचा पाऊस लांबल्याने तसेच कुकडी प्रकल्पातील आवर्तनामुळे नैसर्गिक जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठा मर्यादित झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या आदेशानुसार तालुक्यातील जलसाठे कायम राखण्यासाठी प्रशासनाने ही कारवाई केली.

प्रांताधिकारी नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार रवी सतवन, कर्जत पोलीस विभाग, कुकडीचे उत्तम धायगुडे, श्रीरंग मेहेरे यांच्या पथकाने दुरगाव तलावावर अचानक धाड टाकली. प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध पाणी उपसा करणाऱ्यांची धावपळ उडाली. पथकाने ३५ मोटारी ताब्यात घेतल्या.

दरम्यान, पावसाअभावी आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचा विचार करून प्रशासनाने समज देत जप्त केलेल्या मोटारी संबंधित शेतकऱ्यांच्या ताब्यात दिल्या. मात्र यापुढे कोणत्याही नैसर्गिक जलस्रोतामधून विनापरवानगी पाणी उपसा करू नये, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. अवैध पाणी उपसा करताना आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी दिला. उपलब्ध पाणीसाठा सर्वांसाठी राखीव ठेवण्याची जबाबदारी प्रशासनासह नागरिकांचीही असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# स्थानिक गुन्हे शाखेचा गंगापूर येथे जुगार अड्ड्यावर छापा !

## लाखोंचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पथकाने दि. ७ सप्टेंबर रोजी राहुरी तालुक्यातील गंगापूर येथे जुगार अड्ड्यावर छापा टाकून आठ जुगार्यांना ताब्यात घेऊन लाखों रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. राहुरी तालुक्यातील गंगापूर शिवारातील एस के पेपर मिल कंपनीचे समोरील पत्र्याचे शेडमध्ये रामदास नान्नोर हा जुगार अड्डा चालवीत असल्याची गोपनीय खबर मिळताच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या आदेशानुसार पोलीस अंमलदार सुनिल पवार, गणेश धोत्रे, अजिनाथ पाखरे, रमीजराजा आतार व विशाल तनपुरे आदि पोलिस पथकाने दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी गंगापूर येथे छापा टाकला. त्यावेळी पथकाने ज्ञानेश्वर पुंजा पवार, अनिल दत्तात्रय होडगर, तसेच चिमा खंडु वडीतके, मनोहर रामदास नान्नोर, बाळासाहेब विठ्ठल तुपे, किरण साहेबराव होण, विठ्ठल बाळासाहेब चितळकर व रामदास रावजी नान्नोर या आठ जुगार्यांना ताब्यात घेतले. आरोपींची अंगझडती घेऊन त्यांच्या ताब्यातून ४ हजार ७१० रूपये रोख रक्कम, ९० हजार रुपए किंमतीचे पाच मोबाईल व २ लाख ५० हजार रुपए किंमतीच्या पाच मोटार सायकल असा एकुण ३ लाख ४४ हजार ७१० रुपए किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपींवर राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

